१०४ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

• मुंबई, मंगळवार ७ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२४, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 124 Marathi - Daily - Mumbai, 7 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

मुंबई-पुणे मिसिंग लिंक होणार 'मिसिंग'?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# नाशिक-त्र्यंबकेश्वरला आज ढगफुटीचा इशारा! मुंबई-पुणे ठप्प
# जेएनपीएत जहाजातील कंटेनर उलटला! १ कामगार ठार

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात उद्या ढगफुटीसदृश पावसाची शक्यता व्यक्त करत प्रशासनाला सावधगिरीच्या सूचना दिल्या. या परिसरात सुमारे ३०० मिमीपर्यंत पाऊस होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी तातडीने उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यांनी पत्रकार परिषद घेऊन नागरिकांना सूचित केले की, नाशिक ग्रामीण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, पेठ आणि दिंडोरी या पाच तालुक्यांतील शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्यात आली असून, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक ग्रामीणमधील आठवडी बाजारही रद्द केले आहेत. त्र्यंबकेश्वर देवस्थान, सप्तशृंगी देवस्थान एक दिवसासाठी भाविकांसाठी बंद ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, अनावश्यक प्रवास टाळावा आणि शेतकऱ्यांनीही शेतात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. पूरप्रवण भागातील नागरिकांचे स्थलांतर, नाले-जलवाहिन्यांची स्वच्छता, लहान बंधाऱ्यांचे दरवाजे उघडे ठेवणे, धोकादायक पर्यटन स्थळांवर बंदोबस्त तसेच बचाव पथक, पोलीस, होमगार्ड, रुग्णवाहिका आणि यंत्रसामग्री सज्ज ठेवण्यात आली आहे.

पान ३ वर

**राज्यात गेले काही दिवस सुरू असलेले जोरदार पावसाचे सत्र आजही कायम राहिले. या पावसामुळे आज नव्याने बांधलेल्या मिसिंग लिंक बोगद्याजवळ दरड कोसळल्याने पुणे-मुंबई जुना व नवा महामार्ग आणि कनेक्टिंग लिंक हे सर्वच वाहतुकीसाठी बंद होऊन दोन्ही शहरांतील संपर्क पूर्णपणे तुटला. उरण येथील जेएनपीए परिसरात वाहणाऱ्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे जहाजातील कंटेनर हवेने उडून खाली पडल्याने एका कामगाराचा मृत्यू, तर दोघेजण गंभीर जखमी झाले. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि नाशिकसह अनेक जिल्ह्यांमध्ये पूर, दरडी कोसळणे, झाडे पडणे आणि इमारतींच्या दुर्घटनांची मालिका सुरू राहिली. मुंबईत पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. राज्यभर उद्याही मुसळधार पाऊस सुरू राहाणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले असून, उद्या नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर परिसरात ढगफुटीसदृश अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यानुसार प्रशासनाने हाय अलर्ट जारी करून शाळा, महाविद्यालये आणि त्र्यंबकेश्वर व सप्तशृंगी देवस्थाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.**



## ७,१२० कोटींच्या 'मिसिंग लिंक'ची संरक्षक भिंत २ महिन्यांतच कोसळली

मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्पालाही पहिल्याच पावसाचा फटका बसला. दोन महिन्यांपूर्वी गाजावाजा करत उद्घाटन केलेल्या या मार्गावरील बोगद्याच्या संरक्षक भिंतीचा काही भाग पुलावर कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली. बोगदा आणि मिसिंग लिंकवर अक्षरश: धबधबा कोसळत असल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले. सुमारे ७,१२० कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या गुणवत्तेबाबत विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले. यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यांनी सांगितले की, मुसळधार पावसामुळे पाण्याच्या प्रवाहात बदल होऊन स्लॅब व संरक्षण भिंतीचा काही भाग कोसळला असून, बोगद्याला कोणतीही हानी झालेली नाही. पाऊस ओसरल्यानंतर तज्ज्ञांकडून तांत्रिक तपासणी केली जाणार असून, मलबा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या घटनेबाबत विधानसभेत निवेदन देताना म्हटले की, मुंबई-पुणे महामार्गावरील ज्या ठिकाणी दरड कोसळली, त्या भागात

पान ३ वर

## मुंबईसह नाशिकला रेड अलर्ट ताशी ८० किमीने वारे वाहणार

हवामान विभागाने उद्यासाठी मुंबई, ठाणे, रायगडसह नाशिक, पुणे आणि सातारा भागांसाठी रेड अलर्ट कायम ठेवला आहे. काही ठिकाणी अतिमुसळधार पावसासह ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा इशारा दिला आहे. जोरदार वाऱ्यांमुळे झाडे उन्मळून पडणे, जुन्या व कच्च्या इमारतींचे नुकसान होणे, पाणी साचणे आणि वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, झाडे, होर्डिंग आणि वीज खांबांपासून दूर राहावे. तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन हवामान विभागाचे बिक्रम सिंग यांनी केले आहे. पुणे, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि मुंबईत उद्याही शाळा-कॉलेजला सुट्टी देण्यात आली आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे उद्या ढगफुटीचा इशारा असल्याने तेथेही शाळा, कॉलेज उद्या बंद राहणार आहेत.

# चंपत राय, अनिल मिश्रांचा राजीनामा मंजूर
## राम मंदिरात २२ जुलैला नवनियुक्त्या होणार

■ अयोध्या

**राम** मंदिरातील देणगी अपहार प्रकरण उघडकीस आल्यानंतर झालेली श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टची पहिली बैठक आज तीन तास चालली. राजीनामा दिलेले ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय मंदिरात आवारात पोहोचले. मात्र चंपत राय यांना बैठकीत घेतले नाही. तर ट्रस्टी अनिल मिश्रा बैठकीला अनुपस्थित राहिले. बैठकीत दोघांचेही राजीनामे मंजूर करण्यात आले आहेत. राय आणि मिश्रा यांच्या जागी नव्या नियुक्त्या २२ जुलैच्या बैठकीत करण्यात येणार असून, निवृत्त आयएफएस अधिकारी कृष्ण मोहन यांची कार्यवाहक महासचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याचे ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांनी आज पत्रकारांना सांगितले.

बैठकीनंतर ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांनी महासचिव चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांचे राजीनामे स्वीकारण्यात आल्याची माहिती दिली. गोविंद देव गिरी म्हणाले की, चंपत राय यांनी जोपर्यंत या प्रकरणातील आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत पदावर राहणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका घेत राजीनामा दिला. घडलेली घटना अत्यंत वेदनादायी असून, दानचोरीची घटना लज्जास्पद आहे. यामुळे आम्ही सर्वजण दुःखी आहोत.

पान ७ वर

### संघ कनेक्शन

कृष्ण मोहन यांनी आयएफएस अधिकारी म्हणून महाराष्ट्रात अनेक वर्षे काम केले आहे. २०१२ मध्ये निवृत्त झाल्यावर ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सहभागी झाले. संघात त्यांनी नगर संघ चालक, जिल्हा संघ चालक आणि प्रांत संघ चालक या पदावर काम केले आहे.

# व्हायरस नाही! व्हॅक्सिन आहोत
## संभाजीनगरमध्ये दीपकेचा एल्गार

■ छत्रपती संभाजीनगर

**नीट परीक्षा** व्यवस्थेतील गैरप्रकार, पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांच्या मागण्यांसाठी जंतरमंतर येथे सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाचा आज १७ वा दिवस होता. एका बाजूला हे आंदोलन सुरू असताना कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके याच्या नेतृत्वात आज संभाजीनगरमध्ये विद्यार्थ्यांनी एल्गार केला. विभागीय आयुक्त कार्यालयासमोर झालेल्या आंदोलनात दीपके याने केंद्र सरकार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत, आम्ही व्हायरस नाही, तर सडलेल्या शिक्षण व्यवस्थेला वाचवणारी व्हॅक्सिन आहोत, असे ठणकावले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारदेखील या आंदोलनात सहभागी झाले होते.

अभिजित दीपके म्हणाला की, देशातील केवळ एका परीक्षेचा पेपर फुटलेला नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थाच सडली आहे. ती बदलण्यासाठी आणि दोष दूर करण्यासाठी आम्ही आंदोलन करत आहोत. आम्ही 'व्हायरस' नाही, तर या व्यवस्थेवरची 'व्हॅक्सिन' आहोत. आम्हाला दहशतवादी किंवा व्हायरस म्हणण्यापूर्वी नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या २० विद्यार्थ्यांच्या मृत्यूची जबाबदारी स्वीकारा. त्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूस केंद्र सरकार जबाबदार आहे. आज आंदोलनाचा १७ वा दिवस आहे.

# मोदींचे आवाहन म्हणून रद्द झालेले
# सुळेंचे रिसेप्शन थाटामाटात कसे झाले?

■ पुणे

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे आणि नागपूरचे





प्रसिद्ध उद्योजक आणि भाजपा विधान परिषद आमदार अरुण लखानी यांचा मुलगा सारंग लखानी यांचा विवाह थाटामाटात २० जूनला संपन्न झाला. विवाहानंतर नागपूरला नवदाम्पत्याच्या स्वागतासाठी भव्य रिसेप्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मात्र व्याही लखानी हे नुकतीच भाजपाने उमेदवारी दिल्याने पंतप्रधान मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनाची आन घेऊन त्यांनी नागपुरातील रिसेप्शन स्थगित केले अशी घोषणा लखानी कुटुंबाने केली. मात्र साधेपणाचा हा आव जास्त काळ टिकला नाही. सुळे आणि लखानी यांनी पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला महिनाभराने हरताळ लावून पुण्यात अगदी श्रीमंतीत रिसेप्शन सोहळा केला. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थितीही लावली. काल पुण्यातील पंडित फार्म्स येथे भव्य रिसेप्शनचे आयोजन करण्यात आले. पाच-सात हजारपेक्षा जास्त पाहुणे आमंत्रित होते. अगदी थाटामाटात कार्यक्रम झाला. महिनाभरात पंतप्रधान मोदींचे आवाहन सुप्रिया सुळे आणि लखानी विसरले, याबाबत कुणाला आश्चर्य मात्र वाटले नाही.

# सबरीमला सुवर्णचोरी प्रकरणी
# ईडीच्या तपासाचा वेग मंदावला

■ कोची

**सबरीमला** मंदिरातील सुवर्णचोरी प्रकरणी सुरू असलेल्या ईडीच्या मनीलॉन्ड्रिंग तपासाचा वेग गेल्या



काही महिन्यांत मंदावल्याचे दिसून येत आहे. गेल्या सुमारे चार महिन्यांत कोणतीही मोठी चौकशी, पुरावे गोळा करण्याची मोहीम किंवा नव्याने मालमत्ता गोठविण्याची कारवाई झाल्याची नोंद नाही. दुसरीकडे पोलिसांनी या प्रकरणात नवीन निष्कर्ष केरळ उच्च न्यायालयासमोर सादर केले आहेत.

जानेवारीमध्ये गुन्हे शाखेने मंदिरातील सोन्याचा मुलामा असलेल्या धार्मिक वस्तू हटवून त्यांचा अपहार केल्याच्या आरोपांप्रकरणी गुन्हे दाखल केल्यानंतर ईडीने अनेक राज्यांमध्ये मोठी शोधमोहीम राबवत या तपासात प्रवेश केला होता. मात्र, त्यानंतर तपासाची गती लक्षणीयरित्या कमी झाल्याने याकडे लक्ष वेधले जात आहे.

# पहलगाम हल्ला पुरवणी आरोपपत्रात
# लष्कर-ए-तैयबा प्रमुख हाफिजचे नाव

■ श्रीनगर

**पहलगाम** दहशतवादी हल्ला प्रकरणात आज एनआयएने (राष्ट्रीय तपास संस्था) विशेष न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल केले. पाकिस्तानी दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाचा प्रमुख हाफिज सईद हा या हल्ल्याचा सूत्रधार असल्याचा आरोप एनआयएने केला आहे. या हल्ल्यात २५ पर्यटक आणि एका स्थानिक नागरिकासह एकूण २६ जणांचा मृत्यू झाला होता.

हे पुरवणीआरोपपत्र जम्मू येथील एनआयए विशेष न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये हाफिज सईदचे नाव वैयक्तिक आरोपी म्हणून तसेच बंदी घालण्यात आलेल्या लष्कर-ए-



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

तैयबा आणि त्याची छुपी संघटना द रेझिस्टन्स फ्रंटचा संस्थापक व प्रमुख म्हणून नमूद करण्यात आले आहे. एनआयएच्या माहितीनुसार, भारतीय न्याय संहिता बीएनएस, २०२३ तसेच बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंध कायदा यूएपीए, १९६७ अंतर्गत विविध कलमांनुसार हाफिज सईदवर आरोप ठेवण्यात आले आहेत. भारताविरुद्ध युद्ध छेडणे आणि सीमेपलीकडून कट रचून हा हल्ला घडवून आणल्याचा आरोप त्याच्यावर आहे. मूळ १,५९७ पानी आरोपपत्राच्या पुढील भाग म्हणून दाखल करण्यात आलेल्या या पुरवणी आरोपपत्रात पाकिस्तानची या हल्ल्यातील कथित भूमिका, हाफिज सईदचा सहभाग तसेच वैज्ञानिक तपास आणि प्रत्यक्ष

पान ७ वर

**इंडियन बायोगॅस असोसिएशन, आर्मी वेल्फेअर प्लेसमेंट ऑर्गनायझेशन आणि रिवील एनर्जी एलएलपी यांच्यात ५० हजार माजी सैनिकांना बायो एनर्जी क्षेत्रात रोजगार देण्यासाठी करार झाला आहे. याअंतर्गत सैनिकांना रिन्यूएबल एनर्जी क्षेत्रात नोकरी मिळवून देण्यासाठी कुशल बनविले जाईल.**

# ५० हजार माजी सैनिकांना
# बायोगॅस क्षेत्रात रोजगार?

■ नवी दिल्ली

**या करारानुसार,** माजी सैनिकांना बायो एनर्जी (बायोगॅस) इकोसिस्टममधील विविध भूमिकांसाठी प्रशिक्षित, पुनर्प्रशिक्षित आणि कुशल बनवले जाईल. वाढत्या रिन्यूएबल एनर्जी क्षेत्रात कुशल कामगारांची मागणी आणि पुरवठा यातील तफावत कमी करणे आणि निवृत्त सैनिकांना शाश्वत करिअरच्या संधी उपलब्ध करून देणे, हे यामागील उद्देश आहे.

याद्वारे देशभरातून इच्छुक माजी सैनिकांचा शोध घेऊन त्यांची निवड केली जाईल. इंडियन बायोगॅस असोसिएशन आपल्या इंडस्ट्री नेटवर्कच्या



माध्यमातून या माजी सैनिकांना ऑनसाईट प्रशिक्षण आणि नोकरीच्या संधी मिळवून देणार आहे.

# टीसीएस धर्मांतर प्रकरणी
# निदा खानला जामीन मंजूर

■ नाशिक

**येथील** टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणात मुख्य आरोपी निदा खानला नाशिक अतिरिक्त सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. सहआरोपी तौसीफ अत्तारलाही जामीन मिळाला. मात्र आरोपी दानिश शेख याचा जामीन न्यायालयाने नाकारला. निदा खान यांचे वकील राहुल कासलीवाल यांनी त्या गर्भवती असल्याच्या कारणास्तव प्रामुख्याने जामीन देण्याची मागणी केली.

न्यायालयाने हे कारण ग्राह्य धरत तिला दिलासा दिला. अटकेत असताना ती साधारण ५ महिन्यांची गरोदर आहे. फिर्यादीच्या वकिलाने सांगितले की, तपासात लैंगिक शोषण आणि सक्तीच्या धर्मांतराचे पुरावे उघडकीस आले आहेत. दानिश शेखने धर्मांतराच्या उद्देशाने आपल्या सहकारी आणि पीडितेला एक इस्लामिक पुस्तक आणि एक बुरखा दिला होता. त्यांचा धर्मांतर करण्याचा प्रयत्न करत होते.

# पावसाळी अधिवेशनाआधी एनडीएची
# ताकद वाढणार! बंडखोरांचा पाठिंबा

■ नवी दिल्ली

**संसदेचे** आगामी पावसाळी अधिवेशन सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीसाठी (एनडीए) अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून या काळात आघाडीची ताकद अधिक वाढलेली दिसण्याची शक्यता आहे. विविध राजकीय घडामोडींमुळे लोकसभा आणि राज्यसभेत एनडीएचे संख्याबळ वाढते आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे लोकसभेतील संख्याबळ सहा खासदारांच्या पाठिंब्यामुळे वाढले आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमधील बहुसंख्य खासदारांनी बंड करत एनडीएला पाठिंबा जाहीर केल्याने तिथूनही संख्याबळ वाढले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधील राज्यसभेच्या तीन जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर केली आहे. या जागा सुखेंदू शेखर रॉय, सुष्मिता देव आणि प्रकाश चिक बराइक यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झाल्या आहेत. ही निवडणूक २४ जुलै रोजी होणार असून, त्याच दिवशी निकालही जाहीर केला जाणार आहे.

सध्याच्या संख्याबळाच्या आधारे दोन जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तिसऱ्या जागेवर मात्र चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. तृणमूल काँग्रेसमधील बंडखोर आमदारांचा पाठिंबा मिळाल्यास ही जागाही एनडीएच्या पारड्यात जाऊ शकते, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या घडामोडींमुळे संसदेतील पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यसभेतील एनडीएचे संख्याबळ वाढून सुमारे १५५ पर्यंत पोहोचू शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

कुरीअर कंपनीमध्ये पिकअप व डिलीव्हरी साठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण- फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवी मुंबई. दररोज रोख ८००/- + प्रवास खर्च. SPEEDMAN EXPRESS 191-B, 9th Cavel Cross lane, 1st floor, Dr. viegas street, Near Barretto high School, Chirabazar, Mumbai- 400002. Note- फोन न करता ऑफीसमध्ये येणे. {NC261127}

इमिटेशन कामासाठी मुले/मुली पाहिजेत. ''कल्प ज्वेलर्स'', युनिट-१०२, ऑम शिवम् सोसायटी, भरुचा रोड, सीलेक्शन बुक सेन्टरवर, मराठा कॉलनी, दहीसर (इस्ट). फोन- **9870041713** {NC261072}

हेडलबर्ग २ कलर मशीनसाठी प्रिंटर आणि बॉयलर पाहिजेत. भायखळा सर्विस इंडस्ट्रीज २०१ राणीबाग. **9819911373** {NCC260029}

## Situation Vacant

Need office girl for back office/ admin staff work in santacruz west Contact **9987976412** {NC261161}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC261156}

## शैक्षणिक

प्रोफेशनल सिव्हिल आर्किटेक्चर ड्राफ्टसमन आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमन कोर्सेस. शिवाय दहावी, बारावी टेक्निकल फेलसाठी टेक्निकल ड्रॉईंग आणि टेक्निकल डिप्लोमा फेलसाठी इंजिनियरिंग ड्रॉईंग. गुप्ते अकॅडमी, दादर. **7506465793/ 9757312624** चौकशी सकाळी ८.३० ते दुपारी ३.३० {NC261140}

## व्यवसायविषयक

महिला/ मुलींना फक्त ६ महिन्यात 10,00,000/- कमवून देणारे जीवन विमा मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC261097}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्व जाती, WEB, मुलींना. FREE- **9869868620** {NC261139}


## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतः च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'

# गुजरातमध्ये अतिवृष्टी तर किश्तवाडात ढगफुटी! जनजीवन विस्कळीत

■ अहमदाबाद

**गुजरातमध्ये** मान्सूनने जोर धरला असून, राज्यातील अनेक भागांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. दक्षिण गुजरात, सौराष्ट्र आणि उत्तर गुजरातमधील विविध जिल्ह्यांमध्ये सतत पाऊस सुरू असल्याने रस्ते जलमय झाले असून, सखल भागांमध्ये पाणी साचले आहे.

भारतीय हवामान विभागाने पुढील ४८ तासांसाठी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. अमरेली जिल्ह्यातील राजुला तालुक्यात घाटरवाडी नदीला पूर आला. पुराचे पाणी अनेक गावांमध्ये शिरले. देशातील इतर राज्यांमध्येही पावसाचा जोर कायम आहे. जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड परिसरात मुसळधार पावसानंतर भूस्खलन झाले. या ढिगाऱ्याखाली ७ वाहने अडकली. क्वार जलविद्युत प्रकल्पाच्या परिसरात ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने मोठे नुकसान झाले. डोडा जिल्ह्यातील प्रेमनगर परिसरातही भूस्खलन झाल्याने जम्मू-किश्तवाड राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी रस्ते बंद करण्यात आले आहेत. ओडिसातील संबलपूर जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे सर्व शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. पश्चिम बंगाल, छत्तीसगड, ओडिशा तसेच बिहार आणि झारखंडमध्येही अनेक भागांत जोरदार पावसाचा परिणाम झाला.

# लोणावळ्यात पर्यटकांवर निर्बंध धोकादायक ठिकाणी जाण्यास बंदी

■ पुणे

**पर्यटकांच्या** सुरक्षेची काळजी घेत पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी लोणावळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत विशेष आदेश लागू केले आहेत. या आदेशानुसार, पर्यटकांना आता धबधब्यांच्या ठिकाणी किंवा कोणत्याही धोकादायक पर्यटन स्थळांवर जाण्यास सक्त मनाई आहे. तसेच, अशा ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे, व्हिडिओग्राफी करणे किंवा रिल्स बनवण्यावरही प्रशासनाकडून पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हे निर्बंध ६ जुलैच्या रात्री १२ वाजल्यापासून ३१ जुलैच्या सकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहतील. लोणावळ्यातील एकवीरा देवी, भुशी धरण, लायन्स पॉईंट, टायगर पॉईंट, पवना धरण, तसेच लोहगड, विसापूर, तिकोणा आणि तुंग यांसारख्या किल्ल्यांवर व इतर पर्यटनस्थळांवर सध्या पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, अतिवृष्टीमुळे या भागात अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे प्रशासनाने सुरक्षिततेच्या दृष्टीने कडक निर्बंध लागू केले आहेत. पावसाळ्यातील पर्यटनाचा आनंद लुटताना नागरिकांनी आपला जीव धोक्यात घालू नये, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असून या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे. पर्यटनस्थळांवरील धोकादायक कड्यांवर किंवा दरीच्या ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे तसेच व्हिडिओ शूटिंग करण्यास मनाई करण्यात आली आहे. पर्यटनस्थळी मद्यपान करणे, मोठ्या आवाजात गाणी लावून ध्वनीप्रदूषण करणे आणि उघड्यावर कचरा टाकण्यास सक्त मनाई आहे. - महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर आणि बेजबाबदारपणे किंवा अतिवेगाने वाहने चालवणाऱ्या चालकांवर प्रशासनाकडून कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अमृत भारत एक्स्प्रेस ट्रेन दररोज चालविण्यास मंजुरी

■ जळगाव

**खानदेश, विदर्भाच्या प्रवाशांना दिलासा**

**महाराष्ट्रातील** खानदेश, विदर्भ तसेच गुजरात, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमधील प्रवाशांसाठी रेल्वे मंत्रालयाने एक दिलासादायक निर्णय घेतला आहे. रेल्वे बोर्डाने १९०२१/ १९०२२ ब्रह्मपूर-उधना-ब्रह्मपूर अमृत भारत एक्स्प्रेस गाडी त्रि-साप्ताहिक सेवेतून आता दररोज चालविण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना आठवड्यातील मर्यादित फेऱ्यांऐवजी वर्षभर नियमित प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

पूर्व किनारी रेल्वे प्रशासनाच्या आदेशानुसार गाडी ब्रह्मपूर-उधना एक्स्प्रेस या गाडीची विशेष फेरी आज ब्रह्मपूर स्थानकावरून रवाना झाली. ब्रह्मपूर-उधना गाडीला दैनंदिन स्वरूप मिळावे, यासाठी पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रलचे डीआरयूसीसी सदस्य तथा धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र शिवराज कोठारी यांनी सातत्याने रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. वाढती प्रवासी संख्या, आरक्षणासाठी होणारी गर्दी आणि खान्देशातील नागरिकांची मागणी याबाबत त्यांनी रेल्वे बोर्डासह संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर रेल्वे बोर्डाने दैनंदिन सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली.

# अनुप जलोटांच्या हस्ते 'जगन्नाथ' ॲपचे उद्घाटन

■ मुंबई

**यंदाच्या** जगन्नाथ रथोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध भजनगायक अनुप जलोटा यांच्या हस्ते श्री जगन्नाथ बलभद्र सुभद्रा चॅरिटेबल ट्रस्टच्या 'जगन्नाथ' मोबाईल ॲप आणि अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. या डिजिटल व्यासपीठाद्वारे रथोत्सवाची अद्ययावत माहितीही मिळणार आहे. १२ दिवसांचा रथोत्सव १६ जुलै रोजी मालाड पूर्व येथील तपोवन मंदिरातून वांद्रे पश्चिम येथील पटवर्धन पार्कपर्यंत काढण्यात येणाऱ्या रथयात्रेने सुरू होईल.

१७ जुलै रोजी पद्मश्री अनुप जलोटा यांची भजनसंध्या, १९ जुलै रोजी 'भगवान जगन्नाथ कथा' हे नाट्य सादरीकरण, दररोज महाप्रसाद आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २५ जुलै रोजी महा नरसिंह यज्ञ व २७ जुलै रोजी 'नीलाद्री बीजे' विधीने रथोत्सवाची सांगता होईल. ट्रस्टने जाहीर केले की, त्यांचे अधिकृत

# मनोज जरांगेंना जीवे मारण्याची धमकी! ऑडिओ क्लीप व्हायरल

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, समाजमाध्यमांवर एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या कथित फोन संभाषणात मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.

मस्साजोगचे सरपंच देशमुख हत्या प्रकरण आणि त्यानंतरच्या विलास घुले हत्या प्रकरणामुळे आधीच जिल्ह्यात तणावाचे वातावरण असताना, या नव्या ऑडिओ क्लिपमुळे राजकीय चर्चांना आणखी उधाण आले आहे. व्हायरल झालेल्या कॉल रेकॉर्डिंगमध्ये एका व्यक्तीकडून आक्षेपार्ह भाषा वापरत जरांगे- पाटील यांना शिवीगाळ करण्यात आली आहे. त्या चौथी पास जरांगेला तर गोळी मारायला लागतेय अशा प्रकारची धमकी दिल्याचेही या क्लिपमध्ये ऐकू येत आहे. खासदार बजरंग सोनवणे यांचे समर्थक बाळासाहेब पाथरकर यांनी रमेश घुले यांच्यावर एमपीडीएअंतर्गत कारवाईची मागणी केली होती.

त्यानंतरच हा धमकीचा फोन झाल्याचा दावा करण्यात येत आहे.

# दिल्लीत २८ वर्षीय नवविवाहितेचा संशयास्पद मृत्यू

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** लोधी कॉलनी परिसरात तिसऱ्या मजल्यावरून पडून २८ वर्षीय नवविवाहित महिलेचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. आकृती सुतार असे मृत महिलेचे नाव असून, पोलिसांच्या तपासानुसार ती निवासी इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली पडली होती. आकृतीच्या कुटुंबियांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा गंभीर आरोप केला आहे.


आकृतीचे लग्न २४ एप्रिल रोजी झाले होते. ती दक्षिण दिल्लीतील पुष्प विहार परिसरातील रहिवासी असून, छतरपूरमधील एका खासगी हेल्थकेअर कंपनीत सेल्स एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत होती. घटनेच्या काही तासांपूर्वीच आकृतीने आपल्या कार्यालयात सहकाऱ्यांसाठी लग्नानंतरची छोटी पार्टी आयोजित केली होती. पार्टी संपल्यानंतर तिचा पती तिला घेण्यासाठी कार्यालयात आला आणि दोघेही तेथून निघाले. सायंकाळी सुमारे ६ वाजता तिने आईशी फोनवर संवाद साधत पार्टीबद्दल माहिती दिली आणि आपण घरी परतत असल्याचे सांगितले होते.

रात्री सुमारे ८ वाजता लोधी कॉलनी पोलिसांना एनडीएमसीच्या पालिका कुंज येथील निवासी इमारतीतून एक महिला खाली पडल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तिला तातडीने एम्स रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.आकृतीच्या कुटुंबियांनी तिच्या मृत्यूबाबत गंभीर शंका व्यक्त केली आहे. कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आकृतीच्या पतीने फोन करून ती बेपत्ता असल्याचे सांगितले. त्यानंतर सुमारे दीड तासाने पोलिसांकडून पालिका कुंज परिसरात एका महिलेचा मृतदेह आढळल्याची माहिती देण्यात आली. हा प्रकार आत्महत्या नसून नियोजित हत्या असल्याचा संशय व्यक्त करून शक्यतो त्यांनी याची सखोल चौकशीची मागणी केली आहे.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात आग्रातील प्रेसच्या तिघांना अटक

■ भिवंडी

**टीईटी** पेपरफुटी प्रकरणात आणखी तिघांना आग्रा येथील प्रिंटिंग प्रेसमधून अटक करण्यात आली आहे. संजयकुमार सुरेशचंद्र शर्मा (४४), बाबुलाल नारायणसिंह कुशवाह (४५), नरेशकुमार पुरणचंद माहौर ऊर्फ निकी (३५) अशी त्यांची नावे आहेत. त्यांना न्यायाधीश एस.एम. सुतार यांच्या भिवंडी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपींना ९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




या प्रकरणात तिघांचा महत्त्वपूर्ण सहभाग असून, आग्रा येथील 'मोहीम पत्रण' प्रिंटिंग प्रेसमधून प्रश्नपत्रिका बाहेर काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे तपासात समोर आले आहे. या तिघांनी काही आर्थिक व्यवहार केले आहेत का, या दृष्टीनेही तपास सुरू आहे. या प्रकरणात आधी सात जणांना अटक केली होती. आता आरोपींची संख्या दहावर पोहोचली आहे.

दरम्यान या प्रकरणाचे धागेदोरे बिहार, हरियाणा, दिल्ली तसेच उत्तर प्रदेशपर्यंत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करून या प्रकरणातील नेटवर्कचा शोध घेतला जात आहे. मालक सांगतील ते काम करणे कामगारांना बंधनकारक असते.

त्यामुळे कामगारांचा टीईटी प्रकरणाशी आर्थिक अथवा इतर कुठलाही संबंध नाही, असे आरोपीचे वकील ॲड. शैलेश गायकवाड यांनी म्हटले आहे.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. ७ जुलै २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | सरकारी कामांमध्ये अधिक वेळ द्यावा लागेल. सहकाऱ्यांची साथ फारशी लाभणार नाही. जोडीदाराबरोबर वाद टाळावेत. |
| वृषभ | ठरवलेले काम जिद्दीने पूर्ण कराल. जोडीदाराकडून आर्थिक मदत होईल. नवीन व्यवहार विचारपूर्वक करावेत. |
| मिथुन | वडिलोपार्जित व्यवसायामध्ये सफलता मिळेल. नोकरीत कामाची दगदग जाणवेल. आर्थिक प्राप्ती चांगली राहील. |
| कर्क | सामाजिक गौरव होईल. व्यावसायिक प्रवास फायदेशीर ठरतील. नोकरीत कामाची प्रशंसा होईल. |
| सिंह | कार्यक्षेत्रात आर्थिक चढउतार जाणवतील. उच्च शिक्षण घेऊ पहणाऱ्यांनासंधी उपलब्ध होतील. आरोग्याची काळजी घ्या. |
| कन्या | विनाकारण चिंता वाढेल. मनातील शंका दूर होतील. जोडीदाराबरोबर गैरसमज होऊ देऊ नका. आर्थिक स्थिती चांगली राहील. |
| तूळ | नोकरीत अधिक जबाबदारी पडल्याने चिडचिड वाढू शकते. बोलण्यावर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवावे लागेल. खर्चाचे प्रमाण वाढेल. |
| वृश्चिक | छोट्या सहलीचा आनंद लुटाल. मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील. संततीच्या शुभवार्ता समजतील. |
| धनु | पाहुणेमंडळींच्या सरबराईत व्यस्त राहाल. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. आनंदीत राहाल. |
| मकर | आत्मविश्वासाने कार्यरत राहाल. तुमचे म्हणणे पटवून द्याल. संततीची चिंता वाटेल. छोटा प्रवास घडेल. |
| कुंभ | आर्थिक चिंता वाढू शकतात. वडीलधाऱ्या मंडळींचा सल्ला उपयोगी ठरेल. खाण्याची पथ्ये सांभाळावीत. |
| मीन | कामाचा अती ताण जाणवेल. मात्र कामे वेळेत पूर्ण झाल्याने समाधान लाभेल. वास्तुसंबंधित कामे मार्गी लागतील. |

# लॉटरी

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 27 • सोडत दिनांक 06/07/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | SL-02 : 1618 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 1618 | कोमल एजन्सी - औरंगाबाद, श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 3413 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 1912 | महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर, प्रिन्स लॉटरी सेंटर ॲंड जनरल स्टोअर्स - कल्याण |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 1287 | 2385 | 2626 | 2962 | 3438 | 3690 | 5171 | 5596 | 7204 | 7275 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1020 | 1239 | 1284 | 2344 | 2634 | 4396 | 4618 | 6369 | 6999 | 7408 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2521 | 2837 | 4378 | 4603 | 4922 | 4977 | 5431 | 6028 | 7851 | 7958 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1039 | 1538 | 2022 | 2508 | 3034 | 3528 | 4094 | 4492 | 5005 | 5455 | 5915 | 6575 | 6994 | 7546 |
| 1101 | 1551 | 2023 | 2542 | 3037 | 3577 | 4138 | 4497 | 5007 | 5491 | 5923 | 6599 | 7017 | 7578 |
| 1107 | 1571 | 2026 | 2547 | 3043 | 3606 | 4154 | 4501 | 5029 | 5518 | 5954 | 6612 | 7029 | 7597 |
| 1117 | 1581 | 2027 | 2572 | 3098 | 3663 | 4166 | 4543 | 5049 | 5525 | 5968 | 6632 | 7033 | 7625 |
| 1121 | 1602 | 2071 | 2583 | 3119 | 3673 | 4194 | 4546 | 5050 | 5537 | 6019 | 6637 | 7079 | 7640 |
| 1137 | 1604 | 2095 | 2597 | 3121 | 3680 | 4244 | 4581 | 5057 | 5549 | 6031 | 6639 | 7121 | 7641 |
| 1139 | 1606 | 2126 | 2607 | 3153 | 3685 | 4245 | 4604 | 5156 | 5563 | 6056 | 6649 | 7167 | 7656 |
| 1141 | 1608 | 2152 | 2611 | 3177 | 3725 | 4291 | 4612 | 5175 | 5566 | 6070 | 6656 | 7172 | 7660 |
| 1163 | 1613 | 2159 | 2612 | 3178 | 3736 | 4292 | 4627 | 5186 | 5576 | 6086 | 6657 | 7175 | 7712 |
| 1174 | 1616 | 2187 | 2650 | 3268 | 3771 | 4323 | 4648 | 5209 | 5582 | 6163 | 6665 | 7194 | 7735 |
| 1177 | 1645 | 2197 | 2673 | 3282 | 3773 | 4341 | 4735 | 5226 | 5594 | 6174 | 6671 | 7219 | 7745 |
| 1182 | 1668 | 2200 | 2697 | 3300 | 3837 | 4342 | 4792 | 5254 | 5595 | 6183 | 6687 | 7254 | 7760 |
| 1188 | 1789 | 2232 | 2720 | 3320 | 3850 | 4355 | 4811 | 5255 | 5616 | 6188 | 6696 | 7272 | 7765 |
| 1191 | 1813 | 2242 | 2729 | 3363 | 3883 | 4374 | 4840 | 5278 | 5620 | 6266 | 6699 | 7296 | 7769 |
| 1192 | 1815 | 2244 | 2739 | 3375 | 3934 | 4378 | 4844 | 5280 | 5645 | 6304 | 6732 | 7297 | 7785 |
| 1195 | 1842 | 2259 | 2823 | 3387 | 3936 | 4411 | 4873 | 5301 | 5709 | 6306 | 6786 | 7337 | 7807 |
| 1199 | 1871 | 2266 | 2827 | 3391 | 3942 | 4419 | 4884 | 5304 | 5728 | 6330 | 6798 | 7338 | 7819 |
| 1231 | 1912 | 2284 | 2838 | 3394 | 3949 | 4445 | 4911 | 5310 | 5742 | 6366 | 6897 | 7344 | 7855 |
| 1313 | 1918 | 2292 | 2882 | 3420 | 3953 | 4447 | 4912 | 5315 | 5784 | 6441 | 6900 | 7350 | 7871 |
| 1318 | 1941 | 2324 | 2887 | 3422 | 3954 | 4455 | 4913 | 5347 | 5805 | 6477 | 6948 | 7378 | 7894 |
| 1344 | 1951 | 2372 | 2902 | 3437 | 3977 | 4458 | 4924 | 5360 | 5814 | 6490 | 6960 | 7422 | 7900 |
| 1356 | 1963 | 2422 | 2903 | 3501 | 4025 | 4465 | 4940 | 5407 | 5818 | 6500 | 6968 | 7479 | 7906 |
| 1361 | 1972 | 2444 | 2971 | 3507 | 4071 | 4469 | 4946 | 5408 | 5859 | 6553 | 6969 | 7483 | 7948 |
| 1419 | 1991 | 2462 | 2981 | 3514 | 4081 | 4473 | 4978 | 5438 | 5884 | 6557 | 6975 | 7501 | 7970 |
| 1491 | 2010 | 2491 | 3030 | 3517 | 4091 | 4482 | 4994 | 5440 | 5905 | 6571 | 6988 | 7508 | 7982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ७/७/२०२६

| | | |
|---|---|---|
| ४ | ९ | ६ |
| ४३ | १३ | ६३ |
| ४८ | १८ | ६८ |
| १५८ | १४६ | १६९ |
| २२० | ३८० | २४० |

## गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

निकाल • सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/07/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-05 : 1407 |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 0240 |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 6144 |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 8405 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1208 | 3207 | 3469 | 3558 | 5790 | 6164 | 6261 | 6385 | 6753 | 8789 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0146 | 3946 | 4273 | 5353 | 5529 | 6968 | 7731 | 8732 | 8898 | 9308 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1681 | 2512 | 3831 | 5263 | 5983 | 6630 | 7364 | 8119 | 9057 |
| | | 1911 | 2621 | 4309 | 5322 | 6068 | 6663 | 7430 | 8154 | 9106 |
| | | 1956 | 2666 | 4347 | 5359 | 6076 | 6665 | 7482 | 8195 | 9148 |
| 0003 | 1076 | 2029 | 2706 | 4454 | 5365 | 6095 | 6675 | 7487 | 8208 | 9205 |
| 0045 | 1083 | 2116 | 2859 | 4455 | 5466 | 6109 | 6699 | 7597 | 8221 | 9220 |
| 0055 | 1174 | 2170 | 2862 | 4456 | 5483 | 6130 | 6768 | 7714 | 8301 | 9293 |
| 0089 | 1260 | 2178 | 3020 | 4501 | 5521 | 6161 | 6869 | 7725 | 8312 | 9349 |
| 0250 | 1281 | 2228 | 3029 | 4614 | 5532 | 6190 | 6923 | 7762 | 8444 | 9351 |
| 0271 | 1290 | 2229 | 3237 | 4634 | 5570 | 6286 | 6969 | 7763 | 8458 | 9448 |
| 0339 | 1300 | 2234 | 3303 | 4732 | 5574 | 6376 | 7174 | 7765 | 8489 | 9460 |
| 0434 | 1306 | 2252 | 3305 | 4834 | 5647 | 6469 | 7188 | 7776 | 8575 | 9461 |
| 0441 | 1375 | 2257 | 3378 | 4977 | 5695 | 6527 | 7218 | 7779 | 8611 | 9479 |
| 0446 | 1510 | 2263 | 3441 | 5017 | 5765 | 6534 | 7229 | 7835 | 8840 | 9662 |
| 0636 | 1511 | 2300 | 3595 | 5028 | 5804 | 6557 | 7247 | 7925 | 9020 | 9728 |
| 0640 | 1539 | 2406 | 3667 | 5077 | 5874 | 6558 | 7260 | 7937 | 9029 | 9963 |
| 0904 | 1609 | 2459 | 3793 | 5158 | 5904 | 6591 | 7299 | 8054 | 9046 | 9974 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/07/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-05 : 1496 | चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5097 | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 4547 | |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1280 | 1540 | 2088 | 2287 | 3307 | 3607 | 3754 | 4651 | 5032 | 5075 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1326 | 2199 | 3655 | 4125 | 4257 | 4338 | 5120 | 5588 | 5739 | 5983 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1014 | 1267 | 1817 | 2256 | 2855 | 3322 | 3743 | 4330 | 4700 | 5005 |
| 1017 | 1341 | 1839 | 2283 | 2999 | 3324 | 3844 | 4344 | 4733 | 5165 |
| 1115 | 1487 | 1860 | 2285 | 3006 | 3377 | 3934 | 4435 | 4741 | 5275 |
| 1121 | 1496 | 1891 | 2376 | 3073 | 3437 | 3956 | 4454 | 4783 | 5563 |
| 1152 | 1571 | 1953 | 2497 | 3078 | 3482 | 4120 | 4457 | 4798 | 5592 |
| 1165 | 1590 | 2021 | 2611 | 3103 | 3563 | 4135 | 4460 | 4841 | 5616 |
| 1187 | 1610 | 2059 | 2662 | 3113 | 3579 | 4143 | 4478 | 4864 | 5685 |
| 1192 | 1697 | 2069 | 2665 | 3250 | 3649 | 4196 | 4505 | 4942 | 5731 |
| 1249 | 1701 | 2223 | 2724 | 3283 | 3704 | 4254 | 4574 | 4972 | 5825 |
| 1254 | 1706 | 2227 | 2727 | 3305 | 3717 | 4268 | 4586 | 4991 | 5976 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# रस्त्यात बंद पडणाऱ्या बेस्टच्या ई-बससाठी मेकॅनिक तैनात करा

■ मुंबई

**बृहन्मुंबई** इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (बेस्ट) उपक्रमाने भाडेतत्त्वावर घेतलेल्या इलेक्ट्रिक बस रस्त्यात बंद पडल्यास त्या तातडीने हटविणे शक्य होत नसल्याने मुंबईतील वाहतूक व्यवस्थेसमोर नवे आव्हान निर्माण झाले आहे. महत्त्वाच्या ठिकाणी मेकॅनिक तैनात ठेवावेत, अशी सूचना मुंबई वाहतूक पोलिसांनी पत्रातून बेस्ट प्रशासनाला केली आहे.

मुंबईतील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलीस विविध उपाययोजना राबवत आहेत. शहरातील प्रमुख मार्गांवर बंद पडलेली वाहने तातडीने हटविण्यासाठी ४१हून अधिक टोईंग क्रेन तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच आवश्यकतेनुसार वाहतूक पर्यायी मार्गांवर वळविण्याचाही प्रयत्न केला जातो. पण बेस्टच्या भाडेतत्त्वावरील ईलेक्ट्रिक बस रस्त्यात बंद पडल्यास परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनते.

**मुंबई वाहतूक पोलिसांचे पत्र**

या बसच्या तांत्रिक रचनेमुळे बिघाड झाल्यानंतर त्यांची चाके लॉक होतात. परिणामी टोईंग क्रेनच्या सहाय्याने बस हलविणे शक्य होत नाही. अशावेळी संबंधित कंपनीच्या मेकॅनिकला घटनास्थळी बोलावून तांत्रिक दुरुस्ती केल्यानंतरच बस हलवता येते. यामुळे अनेकदा वाहतुकीचा वेग मंदावतो आणि कोंडी निर्माण होते. ही समस्या लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी बेस्ट प्रशासनाला दोन वेळा पत्र पाठविले असून यासंदर्भात अधिकाऱ्यांसोबत बैठकीही घेतल्या आहेत.

## महाराष्ट्र सह्याद्री धनलक्ष्मी विकली लॉटरी

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 30/- • सोडत दिनांक 06/07/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SL-00 : 1199 | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2163 (₹ 5000 ची 5 बक्षिसे = 25,000/- जिंकले) | महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1669 | 2831 | 2918 | 3862 | 4200 | 4233 | 4312 | 5294 | 5511 | 5693 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1443 | 1933 | 2129 | 2889 | 3468 | 4026 | 4287 | 4780 | 5066 | 5749 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1484 | 1584 | 2087 | 2766 | 3151 | 3245 | 3660 | 3869 | 3980 | 4093 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2172 | 2727 | 3247 | 3831 | 4481 | 5057 |
| | | 2192 | 2823 | 3294 | 3833 | 4596 | 5139 |
| 1014 | 1458 | 2238 | 2876 | 3322 | 3933 | 4667 | 5156 |
| 1077 | 1471 | 2249 | 2880 | 3327 | 3954 | 4668 | 5180 |
| 1133 | 1547 | 2288 | 3003 | 3342 | 3973 | 4680 | 5278 |
| 1136 | 1577 | 2324 | 3016 | 3357 | 4047 | 4707 | 5325 |
| 1153 | 1619 | 2392 | 3045 | 3387 | 4177 | 4809 | 5378 |
| 1168 | 1765 | 2405 | 3047 | 3451 | 4207 | 4840 | 5458 |
| 1212 | 1791 | 2438 | 3060 | 3551 | 4240 | 4854 | 5547 |
| 1221 | 1873 | 2521 | 3093 | 3603 | 4254 | 4874 | 5636 |
| 1239 | 1911 | 2577 | 3134 | 3739 | 4315 | 4954 | 5639 |
| 1291 | 2005 | 2664 | 3202 | 3799 | 4427 | 4955 | 5758 |
| 1434 | 2126 | 2709 | 3205 | 3804 | 4459 | 4968 | 5796 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## वसईतील पर्यटन स्थळांवर जाण्यास १५ जुलैपर्यंत बंदी

■ वसई

**पावसाळ्यात** घडणाऱ्या दुर्घटना आणि सुरक्षेचा विचार करता, प्रशासनाने वसई तालुक्यातील सर्व प्रमुख पर्यटन स्थळांवर १५ जुलैपर्यंत पूर्ण बंदी घातली.कलम १६३ अंतर्गत जारी केलेल्या या आदेशानुसार, सर्व धबधबे आणि समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांना जाण्यास सक्त मनाई आहे.

वसई तालुक्यात चिंचोटी धबधबा, तुंगारेश्वर धबधबा, देवकुंडी (कामण), फुलपाडा डॅम आणि कुंभारपाडा तसेच सुरुची, रानगाव, भुईगाव, बेनापट्टी, ब्राह्मण पाडा, अर्नाळा, कळंब, नवापूर आणि राजोडी हे समुद्र किनारे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे राजावळी खदाण, तानसा नदी आणि पेल्हार धरण परिसरही पर्यटकांना आकर्षित करत असतो. या सर्व पर्यटन स्थळांवर जाण्यास १५ जुलैपर्यंत मनाई करण्यात आली आहे. या बंदीच्या काळात कोणत्याही पर्यटन स्थळावर किंवा १ किलोमीटरच्या परिसरात ५ किंवा त्यापेक्षा जास्त लोकांना जाता येणार नाही.

## पाऊस आणि जोरदार वाऱ्यांमुळे मुंबईतील २२ विमान उड्डाणे रद्द

■ मुंबई



**मुसळधार** पाऊस, कमी दृश्यमानता आणि ताशी ४२ नॉट्स वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे काल मुंबई विमानतळावरील विमानसेवा विस्कळीत झाली. सुरक्षिततेच्या कारणास्तव धावपट्टीवरील सर्व उड्डाणे सकाळी सव्वा दहा ते सव्वा अकरा या एक तासाच्या कालावधीत पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. त्यामुळे २२ उड्डाणे रद्द करण्यात आली तर ३३० हून अधिक उड्डाणांना विलंब झाला.

दिल्ली आणि इंदूर दरम्यानची इंडिगोची ४ उड्डाणे रद्द करण्यात आली. १३ उड्डाणे सुरत आणि अहमदाबादसह नवी मुंबई विमानतळांवर वळविण्यात आली होती. हवामानात सुधारणा झाल्यानंतर ही विमाने पुन्हा मुंबईकडे रवाना करण्यात आली. एक तासाच्या या बंदचा परिणाम देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवेवर दिवसभर जाणवला. या विलंबाचा सर्वाधिक फटका प्रस्थान करणाऱ्या उड्डाणांना बसला. २२३ उड्डाणे धावपट्टीवर किंवा टॅक्सीवेमध्ये थांबवावी लागली, तर १११ आगमन करणाऱ्या उड्डाणांना हवेतच घिरट्या घालाव्या लागल्या किंवा विलंब सहन करावा लागला. विलंब ५० मिनिटांहून अधिक होता, तर काही प्रवाशांना दीड तासांपेक्षाही जास्त काळ विमानातच प्रतीक्षा करावी लागली.

## इन्फ्रा मॅन हरवल्याच्या विरोधकांच्या घोषणा ! पावसामुळे अधिवेशन स्थगित

■ मुंबई



**मुसळधार** पावसामुळे राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजावर परिणाम झाला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आजचे कामकाज उद्या ११ वाजेपर्यंत स्थगित करण्याची घोषणा केली. त्यापूर्वी विरोधकांनी विधानभवन परिसरात सरकारविरोधात इन्फ्रा मॅन हरवला अशा घोषणा करत मुंबईतील रस्ते, मॅनहोल, झाडे कोसळण्याच्या घटना आणि ढासळलेल्या नागरी सुविधांवरून सरकारला लक्ष्य केले.

मुंबईला लुटवणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, मुंबईकरांना मॅनहोलमध्ये टाकणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, मुंबईकरांना झाडाखाली चिरडणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, मुंबईची वाट लावणाऱ्या सरकारचा धिक्कार असो अशा घोषणांनी विधानभवन परिसर दणाणून गेला.

## रानसई धरण ओसंडले उरणकरांना दिलासा



■ उरण

**जून** महिन्यात तळ गाठल्याने उरणकरांच्या घशाला कोरड पडण्याची भीती निर्माण झाली होती. पाणीकपातीची तलवार डोक्यावर होती. मात्र वरुणराजाने पाच दिवस कृपा केल्याने उरण तालुक्याचा जीवनदायी ठरलेले रानसई धरण काल मध्यरात्रीच्या सुमारास पूर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले. त्यामुळे उरण शहरासह तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, आगामी पाणीटंचाईचे संकट मोठ्या प्रमाणात टळले आहे.

जून महिनाभर अपेक्षित पाऊस न झाल्याने रानसई धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला होता. परिस्थिती इतकी गंभीर झाली होती की, धरणाने डेड स्टॉक गाठल्याने पाणीपुरवठ्यावर निर्बंध आणण्याची वेळ आली होती. नागरिकांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र जुलैच्या सुरुवातीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण चित्रच बदलून टाकले.


१६६ फूट उंचीच्या रानसई धरणातील उपयुक्त पाणीसाठ्याची पातळी ८६ फूट असून, या धरणावर उरण शहरासह तालुक्यातील २५ गावे, विविध औद्योगिक प्रकल्प आणि लाखो नागरिकांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. त्यामुळे धरण ओव्हरफ्लो झाल्याने केवळ नागरिकांनाच नव्हे तर प्रशासनालाही मोठा दिलासा मिळाला आहे.

## २४ व्या मजल्यावरील पेव्हर ब्लॉक चाळीवर कोसळला

■ भाईंदर

**चार जण जखमी**

**भाईंदर**-काशिमिरा येथील गावठाण परिसरात बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या २४ व्या मजल्यावरून सिमेंटचा पेव्हर ब्लॉक शेजारील चाळीच्या घरावर पडला. सोमवारी पहाटे झालेल्या या दुर्घटनेत ४ जण जखमी झाले. मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. काशिमिरा येथील गावठाण भागात 'विघ्नहर्ता' या २४ मजली इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सोमवारी पहाटे मुसळधार पाऊस आणि वेगवान वाऱ्यामुळे इमारतीच्या २४ व्या मजल्यावर ठेवण्यात आलेला सिमेंटचा पेव्हर ब्लॉक अचानक खाली कोसळला. हा ब्लॉक लगतच्या श्री हरिधाम वेल्फेअर सोसायटीतील बैठ्या चाळीच्या पत्र्याच्या छतावर आदळला. छत फोडून तो थेट घराच्या आत पडल्याने घरामध्ये झोपलेल्या सदस्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत प्रियंका चौबे, तिचा पती सतिश चौबे, धर्मेंद्र सोनी आणि संतोष जाधव हे जखमी झाले. जखमी प्रियंका चौबे यांच्यावर ऑर्बिट रुग्णालयात तर अन्य तिघांवर पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




मिसिंग लिंकमध्ये पडणारा धबधबा आणि दरड कोसळल्याबद्दल सरकारची नवनवीन वक्तव्य

## मावळ तालुक्यातील वडीवळे धरण तबबल ९० टक्के भरले

■ मावळ

**तालुक्यातील** वडीवळे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या



मुसळधार पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. आज सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत धरण ८९.४० टक्के भरले होते. त्यामुळे पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी सकाळी ८ वाजल्यापासून धरणाच्या सांडव्यावरील दरवाजांद्वारे नदीपात्रात ५,९२५ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दि. म. डुबल यांनी दिली. पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी ६ वाजेपर्यंत धरण परिसरात १९९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

## पावसामुळे पश्चिम रेल्वे विस्कळीत रुळावर पाणी! स्थानकावर गर्दी

■ वसई

**वसई**-विरारसह पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. पावसाचा मोठा फटका पश्चिम रेल्वेच्या सेवेला बसला. रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने उपनगरीय लोकल सेवा अर्धा ते पाऊण तास विलंबाने धावत होत्या. दुपारी वसई-विरार दरम्यान रेल्वे वाहतूक सेवा पूर्णपणे ठप्प झाली होती.



काल रात्रीपासून सोसाट्याच्या वादळ वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडल्याने रेल्वे स्थानक परिसरात पाणी साचले होते. रेल्वे वाहतुकीवर त्याचा थेट परिणाम झाला. डहाणूहून पहाटे आणि सकाळच्या वेळेत सुटणाऱ्या अनेक लोकल गाड्या संथ गतीने धावत असल्याने त्या पुढील सर्व स्थानकांवर उशिराने पोहोचत होत्या. परिणामी नालासोपारा, वसई, विरार, भाईंदर, मिरा रोड, बोरीवली आदी स्थानकांवर प्रवाशांना अर्धा ते एक तास प्रतीक्षा करावी लागली. नालासोपारा स्थानकात पाणी साचल्याने वसई-विरार दरम्यानची लोकल सेवा ठप्प झाली होती. डहाणू-विरार रेल्वेसेवाही सकाळी बाधित झाली होती.

## केळवा धरण भरून वाहू लागले लगतच्या गावांना सतर्कतेचा इशारा

■ पालघर

**पालघर** तालुक्यातील केळवा धरण मुसळधार पावसामुळे पूर्ण क्षमतेने भरले असून, धरणातून २.९५१ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे धरण परिसरातील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. ४ गावांतील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे.

पश्चिम रेल्वेच्या केळवा रोड स्थानकाजवळ असलेल्या झांगरोली गावाजवळ या धरणातील जलसाठ्याची पातळी ३.२४२ दलघमी इतकी असून, सध्या पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे धरण १०० टक्के भरले आहे. यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आल्याने संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन धरणाखालच्या गावांतील नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. प्रभावित क्षेत्रातील आठ गावांपैकी चार गावे अतिसंवेदनशील घोषित करण्यात आली आहेत. या गावांमध्ये सुमारे १३० कुटुंबे असून, त्यापैकी ६५ कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे.

## मुंबईतील पूरस्थितीचा परिणाम डबेवाल्यांनी सेवा स्थगित केली

■ मुंबई


**मुंबईत** सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुंबईच्या प्रसिद्ध डबेवाल्यांनी आज डबे पोहोचवण्याची सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

मुसळधार पाऊस आणि विविध भागांत पाणी साचल्यामुळे डबेवाल्यांना सुरक्षितपणे प्रवास करणे कठीण झाले आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून आजची सेवा



स्थगित करण्यात आली आहे. या निर्णयाचा परिणाम हजारो नोकरदार आणि विद्यार्थ्यांवर होणार असून, अनेकांना पर्यायी जेवणाची व्यवस्था करावी लागणार आहे.

मुंबईच्या डबेवाल्यांची १२५ वर्षांहून अधिक जुनी परंपरा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही सेवा सुरू ठेवणाऱ्या डबेवाल्यांनी यावेळी मात्र कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष उल्हास मुके यांनी सांगितले की, मुसळधार पावसामुळे विरार-वसई परिसरातील अनेक डबेवाल्यांच्या घरांमध्ये पाणी शिरले आहे. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांची सुरक्षितता हीच सर्वोच्च प्राथमिकता आहे.



मुंबईत सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे कुर्ला मिठी नदीची पाणीपातळी धोक्याच्या दिशेने वाढत आहे. (छाया - दीपक साळवी)

## गाडेश्वर धरणात दोघे बुडाले एकाचा मृत्यू!१ बेपत्ता

■ पनवेल

**मुसळधार** पावसामुळे वाहणाऱ्या गाडेश्वर धरण परिसरातील नदीत पोहण्यासाठी उतरलेल्या दोन तरुणांवर काळाने घाला घातला. पाण्याच्या वेगवान प्रवाहाचा अंदाज न आल्याने दोघेही वाहून गेले. या दुर्घटनेत विचुंबे येथील सुमित पवार याचा मृत्यू झाला असून, नयन म्हात्रे हा तरुण अद्याप बेपत्ता आहे. घटनास्थळी पोलीस आणि बचाव पथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू असून, या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सुमारे दहा मित्रांचा एक ग्रुप धोधाणी येथील वाघाची वाडी परिसरात फिरण्यासाठी गेला होता. परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गाडेश्वर धरण परिसरातील नदी दुथडी भरून वाहत होती. तरीही सुमित पवार आणि नयन हे दोघे नदीत पोहण्यासाठी उतरले. मात्र, पाण्याच्या वेगवान प्रवाहाचा अंदाज न आल्याने दोघेही वाहून गेले. या घटनेचा व्हिडिओही व्हायरल झाला.

# नाशिक-त्र्यंबकेश्वरला आज ढगफुटीचा इशारा! मुंबई-पुणे ठप्प

पान १ वरून

संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे तयारीत आहे.

मुसळधार पावसाचा फटका आज मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि मुंबई-पुणे रेल्वे मार्गाला बसला. खंडाळा घाटाजवळ दरड कोसळल्याने द्रुतगती मार्गावरील मुंबईकडे जाणारा मार्ग बंद झाला. कर्जत-लोणावळा दरम्यान मंकी हिल परिसरात रेल्वे रुळांवर दगड व माती आल्याने मध्य रेल्वेने मुंबई-पुणे मार्गावरील अनेक महत्त्वाच्या गाड्या रद्द केल्या.

पुण्याच्या मावळ तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाटण गावात दरड कोसळून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. पहाटे साडेचारच्या सुमारास डोंगराचा मोठा भाग घरावर कोसळल्याने नंदकुमार दत्तू तिकोणे, त्यांची पत्नी अनिता तिकोणे आणि मुलगा ज्ञानेश्वर (माऊली) तिकोणे हे मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. तर ओझर्डे-सडवली रस्ता वाहून गेला असून शिवणे-सडवली पुलावरून पाणी वाहत असल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग आणि जुन्या महामार्गावर दरडी कोसळल्याने खबरदारीचा उपाय म्हणून पुणे-मुंबईदरम्यानची एसटी सेवा पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आली आहे. सकाळी मुंबईकडे निघालेल्या चार एसटी बसेस उर्से टोलनाका परिसरातून सुरक्षितपणे पुण्याकडे परत बोलावण्यात आल्या. मुंबई-पुणे महामार्गावरील फूड मॉलमध्ये गुडघाभर पाणी साचले होते. पुणे-सीएसएमटी रेल्वे मार्गावरील डेक्कन, सिंहगड, प्रगती एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या. दरड कोसळल्याने बंद केलेली खंडाळा ते मंकी हिल दरम्यानची वाहतूक दुपारनंतर सुरू केली होती.

मुंबईत कांजूरमार्ग-विक्रोळी स्थानकांदरम्यान ओव्हरहेड ईलेक्ट्रिक वायरवर प्लास्टिक अडकल्याने मध्य रेल्वेची लोकल वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. या बिघाडामुळे दोन लोकल गाड्या मार्गातच थांबल्या होत्या. मुंबईतील हिंदमाता, सायन, अंधेरी सबवे, कुलाबा आणि अन्य सखल भागांत आज पुन्हा मोठ्या प्रमाणात पाणी साचले. कुलाबा आणि सांताक्रूझ वेधशाळांनुसार जुलै महिन्याच्या सरासरी पावसाच्या ९० टक्क्यांहून अधिक पाऊस अवघ्या पाच दिवसांत झाला. मीरा-भाईंदर शहरात मेट्रो-९ प्रकल्पातील दीपक हॉस्पिटलसमोरील मेडतिया मेट्रो स्थानकावर जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे स्थानकावरील काही पत्रे उडाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच मुंबई-गोवा महामार्गावर खवटी येथे दरड कोसळली. कशेडी घाटातही रस्त्यावर दरड कोसळल्याने वाहतुकीवर परिणाम झाला.

रायगडमध्ये कुंडलिका नदीने रौद्ररूप धारण केले. नदीच्या पुराच्या पाण्याने रोहा शहराला वेढले. रेवदंडा -नागोठणे परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. पाली येथील प्रसिद्ध बल्लाळेश्वर मंदिरात पाणी साचले. रोहा बाजारपेठ पाण्याखाली गेली. सावित्री नदीला पूर येण्याची स्थिती निर्माण झाल्याने महाडच्या नागरिकांनी मुंबई - गोवा महामार्गावर वाहने उभी केली. रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचे पाणी साचल्याने चिपळूणची बाजारपेठ बंद झाली. या परिसरातील शिव, वशिष्ठी नदीला पूर आला आहे. खेडला आज सकाळपर्यंत २१३ मिमी पावसाची नोंद झाली. कोकणात जाणाऱ्या जनशताब्दी, तुतारी, कोकणकन्या एक्स्प्रेस सुमारे २ तास उशिरा धावत होत्या. कोल्हापुरात राजापूर बंधाऱ्याची पाणी पातळी वाढली. तर पंचगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. ४२ बंधारे पाण्याखाली गेले. गडहिंग्लज - गगनबावडा परिसरात तुफान पाऊस झाला. मात्र मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राला अजूनही पावसाची प्रतीक्षा आहे.

### मुंबईसह राज्यात अतिवृष्टी पंजाब डख यांचा अंदाज खरा

मुंबईसह राज्यातील अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून दिवसभर अतिमुसळधार झाल्याने हवामान तज्ज्ञ पंजाब डख यांनी जुलैच्या पहिल्या आठवड्यात व्यक्त केलेला अतिवृष्टीचा अंदाज खरा ठरल्याची चर्चा आहे. डख यांनी मुंबई, पुणे आणि उत्तर महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला होता. त्यांनी म्हटले होते की, २ ते ८ जुलैदरम्यान कमी दाबाचा पट्टा सक्रिय होऊन त्याचा परिणाम राज्यावर होईल. मुंबईत या कालावधीत एकूण १,००० मिमीपेक्षा अधिक पाऊस होऊ शकतो. या काळात दररोज १५० ते २०० मिमीपर्यंत पावसाची शक्यता आहे, असेही त्यांनी म्हटले होते.

## ७,१२० कोटींच्या 'मिसिंग लिंक'ची संरक्षक भिंत २ महिन्यांतच कोसळली

पान १ वरून - सरासरीपेक्षा जवळपास तिप्पट पाऊस झाला. त्यामुळे १०० टनांहून अधिक माती आणि दगड खाली आले. अशी परिस्थिती यापूर्वी कधीही निर्माण झाली नव्हती. त्यामुळे काही लहान वाहने अडकली होती. विरोधकांच्या टीकेवर उत्तर देताना त्यांनी म्हटले की, ज्यांना केवळ टीका करायची आहे, त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, कनेक्टिंग लिंकला कोणतीही हानी पोहोचलेली नाही. दरड समोरील डोंगर उतारावर कोसळल्याने ही परिस्थिती उद्भवली. भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्यांनी स्वतःच्या कार्यकाळातील कामगिरीही पाहावी. २०१३ मध्ये हा प्रकल्प अशक्य असल्याचे सांगून फाईल बंद केली होती. मात्र महायुती सरकारने धाडस दाखवत हा प्रकल्प पूर्ण केला.

## पुन्हा झाडे कोसळली

मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरात झाडे कोसळण्याची मालिका सुरूच आहे. वांद्रे येथे विक्रांत सर्कल परिसरात आज आणखी एक मोठे झाड कोसळून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या चार कारचा चक्काचूर झाला. अंधेरी पश्चिमेतील गावठाण, गल्ली क्रमांक १, मदिना हाऊस परिसरात वृक्ष कोसळला. मीरा-भाईंदर येथे झाड कोसळून २ जण जखमी झाले. ठाणे, मीरा-भाईंदर आणि नालासोपारा येथे वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग, पत्रे आणि झाड कोसळण्याच्या घटना घडल्या. ठाण्यात आरटीओ कार्यालयाबाहेर झाड कोसळले. त्याचबरोबर वृंदावन बसथांबा परिसरात झाड कोसळून इमारतीवर टेकले. झाड हटविण्याच्या कामादरम्यान ३२ वर्षीय अग्निशमन जवान अंकित यादव यांच्या पायाला कटर मशीनमुळे गंभीर दुखापत झाली. पोखरण रोड क्रमांक १ उपवन तलावाजवळ झाड कोसळल्याने संपूर्ण रस्ता बंद झाला. ठाणे-बेलापूर मार्गावर झाड उन्मळल्याने वाहनाचे नुकसान झाले. जीटीबी नगर स्थानक पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावर झाडाची फांदी रेल्वे रुळांवर पडल्याने रेल्वे वाहतूक सुमारे २५ मिनिटे विस्कळीत झाली होती. सानपाडा येथे नाना कोळेकर सोसायटीच्या भिंतीवर झाड कोसळले. दादर पूर्व येथील चित्रा सिनेमागृहाबाहेर मोठे झाड कोसळले. त्यामुळे एका गाडीचे नुकसान झाले. झाड कोसळण्याच्या घटनांबाबत मुख्यमंत्री फडणवीस विधानसभेत म्हणाले की, मुंबईत गेल्या वर्षी ८०० झाडे पडली होती. काल एका दिवसात ३५० झाडे कोसळली. आपण सर्व तयारी केली होती, पण निसर्ग बदलल्याने आपत्ती ओढावली.

## जेएनपीएत दुर्घटना

उरण तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी मध्यरात्रीपासून वादळी वाऱ्याने अक्षरशः धुमाकूळ घातला. या वादळी वाऱ्यामुळे जेएनपीए परिसरातील एनएसएफटी टर्मिनलमध्ये उभे असलेले काही कंटेनर अचानक कोसळून त्याखाली कामगार अडकल्याची गंभीर घटना घडली. या दुर्घटनेत बिहार येथील अमितकुमार किशोर प्रसाद (१९) या तरुण कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची, तर अन्य दोन कामगार गंभीर जखमी झाल्याची माहिती अधिकृत सूत्रांकडून मिळत आहे.



आज सकाळी टर्मिनलमध्ये नियमित काम सुरू असताना अचानक जोरदार वाऱ्यामुळे उभे असलेले काही रिकामे कंटेनर वाऱ्याने उडून कामगारांच्या अंगावर कोसळले. हा प्रकार इतका अचानक घडला की, कामगारांना स्वतःचा बचाव करण्याचीही संधी मिळाली नाही. दुर्घटनेनंतर परिसरात एकच धावपळ उडाली. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले, तर मृतदेह शवविच्छेदनासाठी उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. या गंभीर दुर्घटनेबाबत जेएनपीए प्रशासनाशी संपर्क साधूनही कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. इतर संबंधित शासकीय यंत्रणांनीही याबाबत मौन बाळगल्याचे दिसून आले. त्यामुळे नेमकी घटना काय घडली, सुरक्षेच्या नियमांचे पालन झाले होते का, वादळी वाऱ्याचा अंदाज असतानाही काम सुरू का ठेवण्यात आले, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही कामगारांनी कंटेनर कोसळल्याच्या घटनेला दुजोरा दिला असून, सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# तुकोबांनी सांगितलेले सर्व सुखाचे माहेर

*चला पंढरीसी जाऊ। रखमादेवीवरा पाहू।*
*डोळे निवतील कान। मना तेथे समाधान।*
*संता महंता होतील भेटी। आनंदे नाचो वाळवंटी।*
*ते तीर्थांचे माहेर। सर्व सुखाचे भांडार।*
*जन्म नाही रे आणिक। तुका म्हणे माझी भाक।*

आज जगद्गुरू तुकोबाराय यांच्या पालखीचे तीर्थक्षेत्र देहूहून प्रस्थान होते आहे. ज्या इंद्रायणी नदीने तुकोबांचे बुडालेले अभंग पुन्हा आणून दिले, त्याच देहूचे निवासी जगद्गुरू तुकोबारायांनी मनुष्यमात्राला भवसागरातून तरून जाण्याचा हमखास मार्ग दाखवला. तो मार्ग म्हणजेच पंढरीची वारी. वर दिलेल्या अभंगामध्ये तुकोबारायांनी केवळ वारीचे महत्त्व सांगितलेले नाही तर या जन्ममरणाची येरझार थांबवण्याकरीता सांगितलेला उपाय आहे. परमेश्वरानेच दिलेला एकमेव उपचार म्हणजे पांडुरंगाची भक्ती. त्या भक्तीची एक सामूहिक शक्ती किंबहुना प्रत्यक्ष पांडुरंगाचीच अभिव्यक्ती म्हणजे पंढरीची वारी आहे. हेच तुकोबांनी या अभंगाच्यानिमित्ताने तुम्हा आम्हाला सांगितलेले आहे. पंढरपुराला भक्तीमार्गाचे वैकुंठ म्हटले गेले आहे. किंबहुना एखाद्या सासुरवाशिणीला चार-पाच दिवसांसाठी का होईना, पण मिळणारा माहेरचा सहवास हा 'सर्व सुखाचे आनंद' देणारा असतो. तशाच प्रकारची भावना तुकोबा आपल्या या अभंगातून व्यक्त करतात. त्यांनी तर सर्व तीर्थांपेक्षाही पंढरपुरात ईश्वरभक्तीचा ओलावा सर्वाधिक जास्त असल्याचे म्हटले आहे. त्याला त्यांनी सर्व तीर्थांचे माहेर आणि सर्व सुखाचे भांडार असे म्हणून तिथेच खऱ्या अर्थाने मनाला समाधानाची प्राप्ती होत असल्याचे सांगितले आहे. वीटेवर उभ्या असलेल्या पांडुरंगाचे समचरण पाहिल्यानंतर डोळे निवतात. म्हणजे अखंड होणारा विठोबा रखुमाईचा जयघोष कानालादेखील आनंद देतात. एवढेच नव्हे तर तुकोबा म्हणतात की, या जन्मामध्ये ही पर्वणी साधून घ्या. पांडुरंग भेटीचा हा योग याच जन्मात अनुभवण्याचे वरदान प्राप्त झालेले असते. दुसऱ्या जन्माची वाट बघू नका. म्हणजेच विठ्ठलाची भक्ती आणि त्याच्या दर्शनाची आसक्ती यामध्येच जीवनाची खरी यथार्थता दडलेली आहे. दरवर्षी ज्येष्ठ वद्य सप्तमीला तुकोबांची आणि अष्टमीला ज्ञानोबारायांची पालखी आळंदीहून पंढरीच्या दिशेने चालू लागते.

### विठ्ठलभक्तीची आर्तता

गेल्या अनेक शतकांचा हा वारीचा नेम आहे. तो नियम नाही. महाराष्ट्रातल्या हजारो घरांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या ही वारीची परंपरा जपली जाते. घरदार प्रपंचाचा विचार न करता मिळालेल्या आयुष्याचे सोने करण्याच्या हेतूने आणि याच जीवनाचा संत महंतांच्या सहवासातला मणिकांचन योग प्राप्त करून घेण्याची संधी साधली जात असते. कारण जशी तुकोबांना विठ्ठल भेटीची आर्तता लागली होती. आणि ती त्यांनी आपल्या शेकडो अभंगांमधून बोलूनही दाखवली आहे. तशाच प्रकारची आर्तता वारीला जाणाऱ्याच्या मनामध्ये निर्माण झाली पाहिजे. आणि अशी आर्तता असते म्हणूनच या सगळ्या वारकऱ्यांची विठोबा वाट पाहत असतो. वारीची केवळ आवड असून चालत नाही. त्याविषयीचे वेड असणं तितकंच महत्त्वाचं असतं. आपल्या आणखी एका अभंगात तुकोबा म्हणतात.

*जावे पंढरीसी, आवडे मानसी।*
*कधी एकादशी आषाढी हे।*
*तुका म्हणे ऐसे, आर्त ज्याचे मनी।*
*त्याची चक्रपाणी वाट पाहावे।*

ज्या पद्धतीने लाखो वारकरी न चुकता दरवर्षी आषाढीच्या वारीला जातात. म्हणजेच त्यांना वारीचे वेध लागलेले असतातच. परंतु जसजशी आषाढी एकादशी जवळ येऊ लागते तसतशी विठोबाच्या या समचरणाच्या दर्शनाची आर्तताही वाढत जाते. भक्तीची ही ओढच वारकऱ्यांना पंढरपुरापर्यंत खेचून आणते. ज्या पुंडलिकाची भक्ती पाहून विठू माऊली अठ्ठावीस युगे वीटेवर उभे असल्याचे सांगितले जाते, त्याच विठ्ठलाला पाहण्यासाठी साधारण अठ्ठावीस दिवसांची ही वारी सुफळ संपूर्ण करण्याचा ध्यास वारकऱ्यांना लागलेला असतो. आणि याच वारकऱ्यांचीदेखील विठोबा तितक्याच आतुरतेने वाट पाहत असतो. अशी दृढ श्रद्धा विठ्ठलभक्तांची आहे. किंबहुना हा असा एकमेव भक्तीसोहळा म्हणता येईल की, ज्यामध्ये भगवंतच भक्तांची वाट पाहतो. आणि त्याच जीवाभावाच्या भेटीसाठी लाखो वारकरी पंढरीची वाट चालत असतात. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेमध्ये खऱ्या अर्थाने ईश्वरभक्तीतला समन्वय वारीत पाहायला मिळतो. जात, पात, धर्म, संप्रदाय याच्या पलिकडे समचरणाच्या भक्तीचा हा प्रवाह विलक्षण ठरतो.

### सनातन अभिसरण


ज्याअर्थी शेकडो वर्षांनंतरही स्वयंस्फूर्तीने, स्वयंशिस्तीने वारीचा हा सोहळा निमूटपणे पार पडतो त्याअर्थी श्रद्धा किंवा भक्ती ही कोणत्याही कायदा नियमांपेक्षाही किती मोठे समाजकार्य घडवून आणते हेही यानिमित्ताने लक्षात येते. ठराविक मुक्कामाच्या ठिकाणी हजारो लोकांच्या निवास आणि भोजनाची व्यवस्था आणि वारीतही चालताना शक्य तितकी पाळली जाणारी शिस्त या सगळ्या गोष्टी पाहिल्या की, आपण स्वीकारलेल्या या भक्तीच्या व्रताला आपणच कसे बांधिल आहोत, हे वारीच्या नियोजनातून सिद्ध होते. ज्या तुकोबा ज्ञानोबांनी भक्तीमार्गाचे हे नेम घालून दिले, तेच आजही पाळले जातात. पंढरपुरात पोहोचणाऱ्या ज्ञानोबा तुकोबांच्या पालख्या भगवंत आणि भक्तांच्या भेटीचा तो अनुपम सोहळा असतो. वारीतला प्रत्येक भक्त पाच-पंधरा दिवस केवळ आपले घरदार विसरत नाही तर विठ्ठलनामामध्ये तल्लीन होताना तो स्वतःलाही विसरतो. हीच शरणागतता आणि समर्पणता तुकोबांना आणि ज्ञानोबांना अभिप्रेत असते. याच आर्ततेतून भगवंत हा भक्तांसाठी धावून येत असतो. वारीच्यानिमित्ताने एक सांस्कृतिक मंथन तर घडतेच, पण सामाजिक अभिसरण घडून अवघा रंग एकची झाला असे वारीचे स्वरूपदर्शन साकार होत असते. भारताच्या समाज व्यवस्थेला कायदे नियमांपेक्षाही भक्तीच्या या सनातन धर्माने बांधून ठेवलेले आहे. ज्या विठ्ठलाच्या चरणी चंद्रभागा किंवा भीमा नदी वाहते, ती जगाचा उद्धार करणारी असल्याची प्राचीन समजूत आहे. थोडक्यात अनेक प्रकारच्या चिंता विवंचनांपेक्षाही मिळालेला जीवनाचा उद्धार करून घेण्याची सुवर्णसंधी म्हणूनच वारीकडे पाहिले जाते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

उपकाराची परतफेड करता येत नसते,
जाणीव ठेवणे हीच परतफेड असते.

## पंचांग



**मंगळवार, ७ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** निज ज्येष्ठ कृष्ण सप्तमी**
**नक्षत्र : उत्तरा भाद्रपदा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मीन**

**रवी उदय- ०६-०८**
**रवी अस्त- १९-१९**

**कालाष्टमी, संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान - देहू**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### कच्च्या कांद्याची चटणी



**ग्रामीण भागात अजूनही ही चटणी गरम भाकरी आणि वाफाळत्या भातासोबत खाल्ली जाते. कमी वेळात तयार होणारी ही चटणी जेवणाची चव अनेक पटींनी वाढवते. आजच्या धावपळीच्या जीवनात झटपट आणि चविष्ट पर्याय म्हणून ही चटणी पुन्हा चर्चेत आली आहे. खाद्यप्रेमींमध्ये तिची लोकप्रियता झपाट्याने वाढत असून एकदा खाल तर पुन्हा खाणार.**


★ **साहित्य :** ८-९ लसूण पाकळ्या, १ लहान चमचा जिरे, मीठ - चवीनुसार, लाल तिखट - चवीनुसार, कैरी - थोडी (असल्यास).

★ **कृती :** सर्वप्रथम खलबत्त्यात जिरे आणि लसूण टाकून चांगले वाटून घ्या. त्यात कैरीचे छोटे तुकडे टाकून पुन्हा थोडे बारीक ठेचा. आता त्यात कांद्याचे तुकडे घाला आणि कांदा चांगला ठेचून घ्या.

त्यानंतर लाल तिखट घालून पुन्हा एकजीव करून वाटून घ्या. शेवटी चवीनुसार मीठ घाला.

तयार चटणी एका भांड्यात काढून त्यावर कच्चे तेल घाला.

**टीप -** कांद्याला पाणी सुटते म्हणून मीठ शेवटी घालावे.



## क्रीडा

# ब्राझीलचा पराभव होताच नेमारची निवृत्ती

## नॉर्वे विजयासह प्रथमच उपांत्यपूर्व फेरीत



**फिफा विश्वचषकामध्ये सहाव्यांदा चॅम्पियन बनण्याचे ब्राझीलचे स्वप्न भंगले. न्यू जर्सीमधील मेटलाईफ स्टेडियमवर उपउपांत्यपूर्व सामन्यात नॉर्वेने ५ वेळच्या चॅम्पियन ब्राझीलला २-१ ने पराभूत करून स्पर्धेतून बाहेर काढले. या पराभवानंतर लगेचच ब्राझीलचा दिग्गज खेळाडू नेमारने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली. यामुळे या ब्राझिलियन फुटबॉलपटूच्या एका गौरवशाली युगाचा अंत झाला. सामन्यानंतर नेमारला रडू कोसळले आणि तो म्हणाला, मी माझा सर्वोत्तम प्रयत्न केला, आता सर्व काही संपले आहे. माझा प्रवास येथेच सुरू झाला होता, तिथेच संपला.**

■ न्यू जर्सी

**सामन्याच्या** सुरुवातीपासूनच ब्राझीलने नॉर्वेवर दबाव कायम ठेवला. परंतु नॉर्वेच्या बचावाने भिंतीप्रमाणे भक्कम बचाव करत ब्राझीलला गोल करण्यापासून रोखले. ७९ व्या मिनिटाला ऑंडर्स स्केजल्डर्पच्या अप्रतिम पासवर अर्लिंग हालंडने हेडरद्वारे गोल करून नॉर्वेला १-०अशी आघाडी मिळवून दिली. काही मिनिटांनंतरच हालंडने आपला दुसरा गोल करून स्कोअर २-० असा केला. तिथून पुढे ब्राझीलसाठी पुनरागमन करणे अधिकाधिक कठीण होत गेले. सामन्याच्या शेवटच्या मिनिटात म्हणजेच अतिरिक्त वेळेत नॉर्वेच्या लिओ ओस्टिगार्डने कॅसेमिरोवर फाऊल केल्यामुळे ब्राझीलला पेनल्टी मिळाली.

अतिरिक्त वेळेच्या १० व्या मिनिटाला नेमारने ही पेनल्टी गोलमध्ये रुपांतरित केली. या गोलमुळे ब्राझीलला विजय मिळाला नसला तरी त्यांच्या पराभवाचे अंतर (२-१) थोडे कमी झाले. अशाप्रकारे सामना जिंकून नॉर्वेने आपल्या ८८ वर्षांच्या इतिहासात प्रथमच फिफा विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. हा गोल नेमारचा या विश्वचषकातील पहिला आणि त्याच्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ८० वा गोल होता. त्याने ब्राझीलसाठी एकूण १३० सामने खेळले, ज्यात ८० गोल केले आणि ५९ वेळा गोलसाठी सहाय्य केले. तो ब्राझीलचा सर्वकालीन सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्त झाला.

आपल्या कारकिर्दीत नेमारने ब्राझीलच्या २०१३ च्या फिफा कॉन्फेडरेशन्स कप विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. तसंच, त्याने २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये मायदेशात संघाला ऐतिहासिक पहिले ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवून दिले होते.

**८ जुलैचा उपांत्य पूर्व सामना**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १.३० | स्विट्झर्लंड विरुद्ध कोलंबिया |

## राज्य कॅरम मानांकन स्पर्धेत मुंढे आणि मधुराची आगेकूच

**समृद्धी घाडीगावकरचा पराभव**

■ कोल्हापूर

**कोल्हापूरच्या** नरसोबा वाडीतील हॉटेल मंगलम येथे श्री दत्तराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने कै. अशोक पुजारी यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या १० व्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटातील उपउपांत्य फेरीच्या सामन्यात पुण्याच्या अनिल मुंढेने पुण्याच्याच त्याच्या सहकारी अभिजित त्रिपनकरवर रंगतदार तीन सेटच्या लढतीत २५-१६, १४, २५, १९-१७ असा निसटता विजय मिळवला. तर महिला एकेरीच्या उप उपांत्य सामन्यात ठाण्याच्या मधुरा देवळेने ठाण्याच्याच समृद्धी घाडीगावकरवर तीन सेटनंतर २५-१७, १७-२३, २०-५ असा विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली.

पुरुष एकेरी उपउपांत्य फेरीत महम्मद घुफ्रानने झैद अहमद फारुकीवर २५-५, २५-४, विकास धारियाने दिनेश केदारवर १९-१७, २५-७, रहिम खानने पंकज पवारवर २०-११, २५-५ असा विजय मिळवला. महिला एकेरी उपउपांत्य फेरीत मैत्रेयी गोगटेने दीक्षा चव्हाणला २५-९, १३-२२, १५-११, ऐशा साजिद खानने केशर निर्गुणला १९-१२, ०-२५, २१-१७, श्रुती सोनावणेने चैताली सुवारेला २५-४, २०-२५, २४-६ ने पराभूत केले.


## रेटिंग गुण घसरूनही भारतीय संघ अव्वल

**दुबई-** श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय टी-२० संघाच्या खराब कामगिरीमुळे आयसीसी टी-२० क्रमवारीतील रेटिंग गुणांमध्ये मोठी घसरण झाली. आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत पराभव आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत सुरुवातीच्या सामन्यांमधील अपयशाचा फटका भारताच्या अव्वल स्थानाला बसला. भारताचे रेटिंग गुण घसरून २७१ झाले, तर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडचे गुण वाढून २६४ झाले. दोन्ही संघांमधील अंतर केवळ ७ गुणांवर आले. भारतीय संघ सलग ३ टी-२० सामने जिंकण्यात अपयशी ठरला.

## इंग्लंडचा मेक्सिकोवर ३-२ ने विजय! ज्युड बेलिंगहॅमचे सलग २ गोल

■ मेक्सिको

**एस्टाडिओ** अझ्टेका स्टेडियमवर झालेल्या फिफा विश्वचषकाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत इंग्लंडने यजमान मेक्सिकोला ३-२ने पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या हाफमध्ये १० खेळाडूंसह खेळत असूनही मेक्सिकोवर इंग्लंड संघाचे वर्चस्व असल्याचे दिसत होते. ज्युड बेलिंगहॅमने इंग्लंडसाठी पहिला गोल केला. त्यानंतर त्याला हॅरी केन आणि जेरेल कुसॅक यांनी साथ दिली. मायदेशात पराभव झाल्यामुळे मेक्सिको स्पर्धेतून बाहेर पडला. १२ जुलै रोजी उपांत्यपूर्व फेरीत इंग्लंडचा सामना नॉर्वेशी होईल या स्टेडियमवर मेक्सिकोच्या प्रेक्षकांची मोठी गर्दी होती. मात्र त्याचा इंग्लंडच्या खेळावर कोणताही परिणाम झाला नाही. इंग्लंडने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता. मात्र मेक्सिकोचे खेळाडू आपल्या शैलीत खेळत होते. ज्युड बेलिंगहॅमने ३६ व्या आणि ३८ व्या मिनिटाला सलग दोन गोल करून संघाला २-० अशी भक्कम आघाडी



मिळवून दिली. मात्र, ४२ व्या मिनिटाला ज्युलियन क्विनोनेसने केलेल्या गोलमुळे मेक्सिकोने पुनरागमनाची आशा निर्माण केली आणि पहिला हाफ २-२ ने संपवला.

दुसऱ्या हाफमध्ये हा सामना आणखी रोमांचक झाला. ५४व्या मिनिटाला इंग्लंडचा बचावपटू जॅरैल क्विन्सियाला रेड कार्ड दाखवण्यात आले, ज्यामुळे संघाला १० खेळाडूंसह खेळावे लागले. असे असूनही इंग्लंडने जबरदस्त झुंजार वृत्ती दाखवली आणि ६० व्या मिनिटाला कर्णधार हॅरी केनने पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतर करुन स्कोअर ३-१ केला. मेक्सिकोने हार मानली नाही आणि ६९ व्या मिनिटाला राऊल जिमेनेझने पेनल्टीद्वारे गोल करुन स्कोअर ३-२ केला.

## झिम्बाब्वे टी-२० मालिका भारतीय संघाची घोषणा

**संजू सॅमसन-हर्षित राणाला डच्चू**

■ मुंबई

**बीसीसीआयने** झिम्बाब्वेविरूद्ध टी-२० मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे. श्रेयस अय्यर संघाचे नेतृत्त्व करणार असून तिलक वर्मा उपकर्णधार आहे. भारताला टी-२० विश्वचषक २०२६ जिंकून देणाऱ्या संजू सॅमसनला या संघातून डच्चू देण्यात आला. वैभव सूर्यवंशीची निवड करण्यात आली. भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेसाठी संजू सॅमसन भारताच्या टी-२० संघात आहे.

**भारताचा टी-२० संघ**

श्रेयस अय्यर (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा (उपकर्णधार), इशान किशन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, सूर्यांश शेडगे, रिंकू सिंह, हर्ष दुबे, वरूण चक्रवर्ती, प्रिन्स यादव, यश ठाकूर, अशोक शर्मा, मयंक यादव, प्रभसिमरन सिंग.

## विम्बल्डनमध्ये सिनरची आगेकूच सुरुच सलग पाचव्यांदा उपांत्यपूर्व फेरी गाठली

■ लंडन

**जागतिक** क्रमवारीत अव्वल असलेल्या जॅनिक सिनरने उपउपांत्यपूर्व फेरीत जपानच्या शिंतारो मोचिझुकीला ६-३, ७-६(०), ६-३ असे पराभूत करून विम्बल्डन टेनिस स्पर्धेमध्ये सलग पाचव्यांदा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आता सिनर ओपन युगातील अशा निवडक खेळाडूंच्या गटात सामील झाला आहे, ज्यांनी गवताच्या कोर्टवरील प्रमुख स्पर्धेत पाच उपांत्यपूर्व फेऱ्या खेळल्या आहेत.

स्कोअरलाइन एकतर्फी दिसत असली तरी मोचिझुकीने सिनरला अनेक वेळा अडचणीत आणले. पहिल्या सेटमध्ये त्याने सुरुवातीलाच ब्रेक पॉईंट मिळवला, मात्र सिनरने तो वाचवला आणि लगेचच त्याची सर्व्हिस ब्रेक करून तो सेट ६-३ ने जिंकला. दुसरा सेट सर्वात रोमांचक होता. मोचिझुकीने आपल्या उत्कृष्ट सर्व्हिस आणि मजबूत बचावाच्या जोरावर सामना ४-४ असा बरोबरीत ठेवला. त्याने लांब रॅलींमध्ये सिनरला सतत आव्हान दिले आणि त्या इटालियन खेळाडूला अनेक वेळा हताश केले. तथापि, टाय-ब्रेकमध्ये सिनरचा अनुभव कामी आला आणि त्याने एकही पॉईंट न गमावता टाय-ब्रेक ७-० ने जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये, सिनरने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व कायम ठेवले.

## जोकोविचने तोडला फेडररचा मोठा रेकॉर्ड

■ लंडन

**सर्बियाच्या** नोव्हाक जोकोविचने चुरशीच्या सामन्यात १३२ व्या क्रमांकाच्या क्वालिफायर रोमन सफिउलिनवर विजय मिळवत रॉजर फेडररच्या विम्बल्डनमधील विक्रमाची बरोबरी केली. या विजयासह ७ वेळा विम्बल्डन चॅम्पियन राहिलेल्या जोकोविचने ऑल इंग्लंड क्लबमध्ये आपला १०६ वा सामना जिंकला. आता त्याने रॉजर फेडररला (१०५ विजय) मागे टाकत विम्बल्डनमधील पुरुषांच्या सर्वकालीन यादीत अव्वल स्थान पटकावले. मात्र, एकूण यादीत तो अजूनही मार्टिना नवरातिलोवाच्या १२० सामन्यांच्या विजयांच्या विक्रमापासून मागे आहे.

हा टप्पा गाठण्यासाठी जोकोविचला खूप मेहनत करावी लागली. त्याने सफिउलिनविरुद्धचा सामना ७-६ (६), ६-३, ३-६, ६-३ असा जिंकला. पहिल्या सेटमध्ये ५-२ ने मागे असताना जोकोविचनं दोन सेट पॉईंट वाचवून सामना टायब्रेकरमध्ये नेला होता.

## दिल्लीमध्ये १७ जुलैपासून कॉमनवेल्थ टेबल टेनिस स्पर्धा

■ नवी दिल्ली

**नवी** दिल्लीत २२ वी कॉमनवेल्थ टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धा २८ जुलै ते ४ ऑगस्ट ऐवजी २७ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे. दिल्ली सरकार आणि टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा नवी दिल्लीच्या त्यागराज स्टेडियमवर आयोजित केली जात आहे. या स्पर्धेत इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांतील अव्वल खेळाडू आपापल्या देशाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



# समंथाच्या 'मा इंटि बंगारम' चा अनोखा विक्रम!

**दाक्षिणात्य** चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री समंथा रुथ प्रभू हिच्या मुख्य भूमिका असलेल्या 'मा इंटि बंगारम' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कामगिरी करण्यासोबतच आता तेलगू चित्रपटसृष्टीत एक अत्यंत दुर्मीळ आणि अनोखा विक्रम आपल्या नावावर केला आहे.

टॉलीवूडमध्ये सहसा व्यावसायिक यश मिळवणारे मोठे चित्रपट पुरुष प्रधान असतात. मात्र, एका महिला दिग्दर्शिकेने (नंदिनी रेड्डी) एका आघाडीच्या अभिनेत्रीला (समंथा) घेऊन तयार केलेल्या चित्रपटाने व्यावसायिक गणिते पूर्णपणे बदलून टाकली आहेत. या चित्रपटाने केवळ पहिल्या वीकेंडलाच नव्हे, तर एकूण कामगिरीमध्ये महिला-केंद्रित चित्रपटांसाठीचे पूर्वीचे सर्व रेकॉर्ड्स मोडीत काढले असून, असा विक्रम नोंदवणारा हा इंडस्ट्रीतील पहिलाच चित्रपट ठरला आहे. समंथाच्या कारकिर्दीतील हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या विक्रमामुळे दाक्षिणात्य सिनेसृष्टीत महिला-केंद्रित चित्रपटांना मिळणारी व्यावसायिक किंमत आणि स्क्रीन काऊंट यामध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# विकीचे फिजिकल ट्रान्सफर्मेशन

**संजय** लीला भन्साळी यांच्या आगामी बहुप्रतिक्षित आणि भव्य 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटात रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांच्यासोबतच अभिनेता विकी कौशल मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी विकी कौशल सध्या प्रचंड मेहनत घेत असून, त्याच्या खास शारीरिक परिवर्तनाचे काही महत्त्वपूर्ण तपशील आता समोर आले आहेत.

भन्साळी यांच्या चित्रपटांमधील पात्रांची भव्यता आणि अचूकता लक्षात घेता, विकीने या भूमिकेसाठी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले आहे. या चित्रपटातील पात्राच्या मागणीनुसार विकीला एका योद्ध्यासारखी मजबूत आणि लीन शरीरयष्टी कमावण्यास सांगण्यात आले आहे. यासाठी तो रोज तासन्तास जिममध्ये घालवत असून, वेट ट्रेनिंग आणि कार्डिओवर विशेष लक्ष देत आहे. सेटवर आधीच कडक सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात आले असल्याने विकीच्या या नव्या लुकची कमालीची गुप्तता पाळली जात आहे, जेणेकरून प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता टिकून राहील. रणबीर, आलिया आणि विकी अशा तगड्या स्टारकास्टने नटलेला हा चित्रपट भारतीय सिनेसृष्टीतील एक मोठा मास्टरपीस ठरेल, असा अंदाज वर्तवला जात असून, विकीची ही नवी मेहनत चाहत्यांसाठी नक्कीच पर्वणी ठरणार आहे.

# अली आणि रिचा पहिल्यांदाच एकत्र

**दिग्दर्शक** शशी वर्मा यांच्या आगामी सिच्युएशनल कॉमेडी चित्रपटात बॉलीवूडमधील लोकप्रिय रिअल-लाईफ कपल अली फजल आणि रिचा चड्ढा हे पहिल्यांदाच पडद्यावर एकमेकांसोबत रोमान्स करताना दिसणार आहेत. यापूर्वी त्यांनी 'फुकरे' या गाजलेल्या फ्रँचायझीमध्ये एकत्र काम केले असले, तरी मुख्य भूमिकेत जोडीदार म्हणून काम करण्याची ही त्यांची पहिलीच वेळ असेल. अद्याप शीर्षक निश्चित न झालेल्या या चित्रपटात दिग्गज अभिनेते कुमुद मिश्रा हे देखील एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. दिल्लीच्या गजबजलेल्या आणि रंगतदार वातावरणावर आधारित असलेल्या या चित्रपटात दैनंदिन जीवनातील विनोद, भावना आणि सामाजिक संदेशाचा सुरेख संगम पाहायला मिळणार आहे. या नव्या चित्रपटाचे शूटिंग २०२६ च्या उत्तरार्धात सुरू होणार असून, एप्रिल २०२७ मध्ये हा चित्रपट थिएटरमध्ये रिलीज करण्याचे नियोजन आहे.



# जान्हवी आणि खुशीचं 'सरप्राईज'


कपूर कुटुंबात सध्या लग्नाची लगबग पाहायला मिळत असून, अंशुला कपूर आणि रोहन ठक्कर लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. या विवाहसोहळ्याची सुरुवात म्हणून नुकताच अंशुलाचा मेहंदी सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे, तिची बहीण जान्हवी कपूर आणि खुशी कपूर यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन एका 'सरप्राईज' स्वरूपात केले होते.

अंशुलाला घरात एक कौटुंबिक कार्यक्रम होणार असल्याची कल्पना होती. मात्र तिच्या बहिणींनी तिच्यासाठी इतकी सुंदर तयारी केली असेल, याची तिला अजिबात कल्पना नव्हती. घरातच आयोजित केलेल्या या अत्यंत खासगी आणि कौटुंबिक सोहळ्यात जवळचे नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होते. याबद्दल भावना व्यक्त करताना अंशुलाने सोशल मीडियावर लिहिले, एक सोहळा होणार आहे एवढंच मला ठाऊक होतं, पण माझ्या बहिणींनी माझ्यासाठी काय स्वप्न पाहिलंय याची मला कल्पना नव्हती. हा सोहळा डोळ्यांसमोर उलगडताना पाहणे आणि एवढ्या प्रेमाने वेढलेले असणे, ही आठवण मी आयुष्यभर जपून ठेवेन.



# 'जीडीएन'चा ट्रेलर प्रदर्शित

**भारतीय** सिनेसृष्टीतील अष्टपैलू अभिनेता आर. माधवन पुन्हा एकदा एका ऐतिहासिक भूमिकेसाठी सज्ज झाला आहे. भारताचे थोर संशोधक आणि प्रसिद्ध उद्योगपती गोपाळसामी दुरैसामी नायडू म्हणजेच जी. डी. नायडू यांच्या जीवनावर आधारित 'जीडीएन' या आगामी बायोपिकचा अधिकृत ट्रेलर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला आहे. या ट्रेलरमध्ये आर. माधवन जी. डी. नायडू यांच्या मुख्य भूमिकेत दिसत आहे. भारताच्या तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि औद्योगिक क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाला पडद्यावर जिवंत करण्यासाठी माधवनने कमालीचे शारीरिक परिवर्तन केले असून, तो एका वेगळ्याच अवतारात पाहायला मिळत आहे. हा चित्रपट १७ जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. माधवनने यापूर्वी 'रॉकेट्री: द नंबी इफेक्ट' या चित्रपटात इस्त्रोचे शास्त्रज्ञ नंबी नारायणन यांची भूमिका साकारून प्रेक्षकांची आणि समीक्षकांची मने जिंकली होती.



## मुंबईतील फुटपाथवर आता कमी उंचीची झाडे लावणार

### मुंबई पालिका देणार उद्यान विभागाला धडे

■ मुंबई

**चेंबूरमध्ये** शाळेच्या बसवर झाड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यानंतर पालिका प्रशासन सतर्क झाले आहे. आता पालिका मुंबईतील रस्त्यांच्या फुटपाथवर जपानच्या धर्तीवर कमी उंचीची सावली देणारी झाडे लावण्याचा विचार करत आहे. स्थानिक पर्यावरणाला अनुकूल अशी ही झाडे लावली जाणार आहेत.

फुटपाथवर कमी उंचीची आणि सावली देणारी झाडे लावल्यामुळे पादचाऱ्यांना चालण्यास त्रास होत नाही आणि झाडे कोसळण्याच्या घटनाही टळणार आहेत. कमी उंचीची कोणती झाडे लावायची याबाबत पालिका तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून उद्यान विभागातील अधिकारी आणि



कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणार आहे. तसेच झाडांविषयी नगरसेवक आणि जनतेमध्ये जागृती मोहीम राबविली जाणार आहे. तसेच वैज्ञानिक नियोजनावर भर दिला जाणार आहे. सर्व २३७ प्रभागांत माहितीपर कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. मुंबईची जमीन खडकाळ असल्यामुळे झाडांच्या मुळ्या खोलवर न जाता आडव्या दिशेने पसरतात. त्यात झाडांभोवती होणारे सिमेंटीकरण, विकासकामांदरम्यान झाडाच्या मुळांची होणारी कापणी आणि पावसाळ्यात वाढलेले वजन यामुळे झाडे किंवा फांद्या कोसळण्याचा धोका वाढतो. त्यामुळे स्थानिक हवामान आणि जमिनीला अनुरूप देशी प्रजातींची झाडे लावण्यावर भर देण्यात येईल.

## दिल्ली सरकारी रुग्णालयात वरिष्ठ डॉक्टरची आत्महत्या

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** अरुणा असफ अली सरकारी रुग्णालयात कार्यरत असलेले ३५ वर्षीय वरिष्ठ निवासी डॉक्टर डॉ. सिमरप्रीत सिंह आनंद यांनी रात्रपाळीदरम्यान ड्युटी रूममध्ये आत्महत्या केली.

मूळचे पंजाबमधील लुधियाना येथील असलेले डॉ. आनंद गेली तीन वर्षे अरुणा आसफ अली रुग्णालयात कार्यरत होते. पोलिसांच्या माहितीनुसार, ५ जुलै रोजी सकाळी भूलतज्ज्ञ (अॅनेस्थेशिया) विभागातील वरिष्ठ निवासी डॉक्टर डॉ. सिमरप्रीत सिंह आनंद हे ड्युटी रूम क्रमांक १०९ मध्ये बेशुद्धावस्थेत आढळले. ड्युटी रूम आतून बंद होती. संशय आल्याने सकाळी सुमारे ९ वाजता दरवाजा तोडण्यात आला. त्यानंतर त्यांना तातडीने आपत्कालीन विभागात नेले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. घटनास्थळावरून तीन पानी सुसाईड नोट, वैयक्तिक डायरी, सिरिंज आणि औषधांच्या रिकाम्या कुप्या जप्त केल्या असून, सुसाईड नोटमध्ये सहकारी महिला डॉक्टरसोबतच्या प्रेमसंबंधांचा आणि आंतरजातीय विवाहाला कुटुंबियांनी केलेल्या विरोधाचा उल्लेख असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## पावसाळ्यात नागरिकांनी सतर्क रहावे महावितरण कंपनीचे आवाहन

■ भांडूप

**पावसाळ्यातील** मुसळधार पाऊस, वादळी वारे, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे वीजयंत्रणेचे नुकसान होऊन विद्युत अपघात होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे सार्वजनिक तसेच घरगुती वीजयंत्रणेबाबत नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगावी, तसेच संभाव्य धोका टाळण्यासाठी काही ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्रांचा




वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्याची आवश्यकता भासू शकते. अशा वेळी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी केले आहे.

अतिवृष्टीमुळे झाडे किंवा फांद्या पडून वीजतारा तुटणे, वीजखांब वाकणे अथवा कोसळणे, रोहित्र, फिडर पिलर किंवा इतर वीजयंत्रणांच्या परिसरात पाणी साचणे, तसेच ओलाव्यामुळे विद्युत उपकरणांमध्ये बिघाड होऊन अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे तुटलेल्या किंवा लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सुरक्षित अंतर राखावे. अशा तारांना स्पर्श करू नये किंवा त्या स्वतः हटविण्याचा प्रयत्न करू नये.

## पाऊसमृत्यूंसाठी जबाबदार दोषींवर कारवाई करा! वडेट्टीवारांची मागणी

■ मुंबई

**राज्यभर** सुरू असलेल्या मुसळधार पावसात मुंबईसह विविध भागांत झालेल्या दुर्घटनांमध्ये निष्पाप नागरिकांचा मृत्यू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. पावसातील मृत्यूंसाठी जबाबदार असलेल्या अधिकारी आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करून सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी आज विधानसभेत केली. विजय वडेट्टीवार म्हणाले की, पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण, धोकादायक झाडांची छाटणी, उघड्या मॅनहोलची सुरक्षितता, जलनिस्सारण व्यवस्थेची दुरुस्ती आणि आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी आराखडा तयार करण्यात आला असता, तर अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण वाचू शकले असते. मुंबईसह राज्यभर पावसामुळे झालेल्या सर्व दुर्घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित विभागांतील अधिकारी, यंत्रणा आणि जबाबदार व्यक्तींची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

## लोकांना संगणकाला खिळवून ठेवणे ही गेट्स यांची योजना होती

**वॉशिंग्टन** - मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स यांना जास्तीत जास्त सॉफ्टवेअर विकून गडगंज पैसा कमावायचा होता. त्यामुळेच त्यांनी पर्सनल कॉम्प्युटरच्या वापरावर भर दिला. लोकांना संगणकाला खिळवून ठेवणे ही त्यांची योजना होती. जेवढे संगणक वाढतील तेवढी जास्त सॉफ्टवेअर विकली जातील असे गणित गेट्स यांच्या डोक्यात होते, असे परप्लेक्सिटी एआय या कंपनीचे सीईओ अरविंद श्रीनिवास यांनी सांगितले. वर्ड आणि एक्सल ही सॉफ्टवेअर गेट्स यांच्या याच दूरदर्शीपणामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. तासन्तास खुर्चीत बसून संगणकावर काम करणारा कर्मचारी वर्ग गेट्स यांनी तयार केला, असे श्रीनिवास पुढे म्हणाले.

## लोहगाव पंचक्रोशीतील ५ दिंड्यांचे आज प्रस्थान

■ लोहगाव

**पैठणच्या** संत एकनाथ महाराज संस्थान दिंडी समवेत जाण्यासाठी लोहगावसह पंचक्रोशीतील पाच दिंड्या उद्या मंगळवार ७ जुलै रोजी सकाळी श्री पंचदशनाम जुना आखाड्याचे प्रमुख साधू महंत कृष्णगिरी बाबाजी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रस्थान ठेवणार आहेत.

या पाच दिंड्यांमध्ये ब्रह्मलीन महंत सोमगिरी बाबाजी पायी दिंडी (लोहगाव), हर हर महादेव दिंडी, (मुलाणी वाडगाव),गंगेश्वर महादेव दिंडी (लामगव्हाण-जोगेश्वरी),दत्तगुरू संस्थान पायी दिंडी (ढाकेफळ) तसेच जय श्रीराम दक्षिणमुखी हनुमान मंदिर पायी दिंडी यांचा समावेश आहे. या दिंड्यांमध्ये शेकडो वारकरी,झेंडेकरी, ग्रामदेवता पुजन हरीनामाच्या जय घोष,टाळ मृदुंगाच्या निनादात मिरवणूकीने सहभागी होतील.श्री पंच दशनाम जुना आखाड्याचे तथा अंबऋषी शिवालय आमसरी गुंफा संस्थानचे महंत कृष्णगिरी गुरु कैलासगिरी बाबा, महंत श्रीकांतगिरी गुरु कृष्णगिरी, महंत रमेशगिरी बाबा यांच्या उपस्थितीत दिंड्या प्रस्थान ठेवणार आहेत.

## अंबाबाई मंदिराच्या दगडी शिल्पांना आता 'विशेष संरक्षण'

■ कोल्हापूर

**अंबाबाई** मंदिराच्या बाह्य भागावरील काळवंडलेला थर हटवण्यासाठी 'एअर एब्रेशन' प्रक्रियेनंतर आता मंदिराच्या दगडी शिल्पांचे पाऊस, आर्द्रता आणि प्रदूषणापासून संरक्षण करण्यासाठी विशेष जलप्रतिबंधक म्हणजे वॉटर रिपेलंट आवरण लावण्यात येणार आहे. त्यामुळे मंदिराच्या मूळ दगडी रचनेचे आणि कोरीव शिल्पवैभवाचे दीर्घकालीन जतन होणार आहे.

एअर एब्रेशन ही दगडी वारसा वास्तूंच्या संवर्धनासाठी वापरली जाणारी आधुनिक आणि नियंत्रित प्रक्रिया आहे. या तंत्रज्ञानाद्वारे दगडाला कोणतीही हानी न पोहोचवता त्यावरील धूळ, प्रदूषण, शेवाळ, धूर आणि काळवंडलेला थर काढला जातो.यात मंदिराची मूळ कलाकुसर आणि दगडी सौंदर्य पुन्हा खुलून दिसते.संवर्धनाच्या पुढील टप्प्यात मंदिराच्या बाह्य दगडी पृष्ठभागावर विशेष जलप्रतिबंधक आवरण दिले जाणार आहे.

## जयपूरच्या बस-ट्रक वर्कशॉपमध्ये राहुल गांधींचा कामगारांशी संवाद

**जयपूर** - राजस्थानच्या जयपूर येथील बस आणि ट्रक बॉडी-बिल्डिंग वर्कशॉपला आज लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भेट देऊन कामगार आणि उद्योगाशी संबंधित लोकांशी संवाद साधला. त्यावेळी कामगारांनी त्यांना भगवान कृष्णाची प्रतिमा भेट देऊन स्वागत केले. या भेटीचे व्हिडिओ राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून मोदी सरकारवर टीका केली. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, 'मेक इन इंडिया' आणि 'व्होकल फॉर लोकल' या केवळ घोषणा राहिल्या आहेत. मोदी सरकारची धोरणे मोठ्या उद्योगपतींच्या हितासाठी काम करत आहेत. रस्ते वाहतूक मंत्रालयाचे नियम देशभरातील बस आणि ट्रक बॉडी बनवणाऱ्या छोट्या युनिटचा गळा घोटत आहेत. ज्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सरकारकडून सहकार्य मिळायला हवे.

## शनैश्वर देवस्थान अॅप घोटाळा ८ आठवड्यांत निर्णय घ्या

### हायकोर्टाचे आदेश

■ अहिल्यानगर

**नेवासा** तालुक्यातील श्री शनैश्वर देवस्थानातील आर्थिक गैरव्यवहार आणि अॅप घोटाळा प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला ८ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच निर्णय घेण्यापूर्वी याचिकाकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांना वैयक्तिक सुनावणीची संधी देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सोनई येथील सचिन प्रभाकर दरंदले यांनी श्री शनैश्वर देवस्थानातील आर्थिक गैरव्यवहार, बनावट पूजा, बनावट पावती पुस्तके, क्यूआर कोड व्यवहारातील अनियमितता आणि मागील दहा वर्षांच्या आर्थिक व्यवहारांची सीबीआयमार्फत चौकशी व स्वतंत्र लेखापरीक्षण करण्याची मागणी करत मुख्यमंत्र्यांकडे निवेदन दिले होते. त्यावर निर्णय न झाल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली.

## बेळगावात शिंदे गटाची मराठीविरोधी भूमिका ! खा. संजय राऊतांची टीका

■ मुंबई

**महाराष्ट्र**-कर्नाटक सीमाप्रश्नावर सातत्याने मराठी भाषिकांच्या हक्कांसाठी लढा देत असल्याचा दावा करणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर उबाठा खासदार संजय राऊत यांनी दुटप्पी राजकारणाचा आरोप केला. कर्नाटकमधील पक्षाच्या अलीकडील भूमिकेवरून त्यांनी एक्सवर टीका करत शिंदे गटाला लक्ष्य केले.

संजय राऊत यांनी पोस्टमध्ये म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना हरताळ! बेळगावात मराठीविरोधात उघड भूमिका! मिंधे सेनेचे दुटप्पी राजकारण? सीमाभागातील मराठी जनतेत संताप होत आहे. या वादाचे कारण म्हणजे कर्नाटकातील शिंदे गटाच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत घेण्यात आलेले काही महत्त्वाचे निर्णय. या बैठकीत आगामी जिल्हा परिषद आणि तालुका पंचायत निवडणुका स्वबळावर लढविण्याची घोषणा करण्यात आली. कन्नड भाषा जतन आणि संवर्धनासाठी विशेष मोहीम राबविणे, कन्नडेतर उद्योग-व्यवसायांमध्ये काम करणाऱ्यांना कन्नड भाषा शिकविण्यासाठी १०० स्वयंसेवक शिक्षक नियुक्त करणे आणि कन्नड भाषेच्या प्रचार-प्रसाराला चालना देणे, असे निर्णय घेण्यात आले.

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

■ नाशिक

**शहरातील** भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव आता नागरिकांच्या जीवावर बेतू लागला आहे. सिडको परिसरातील खुटवडनगर येथे भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले ५१ वर्षीय राजकुमार यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

राजकुमार हे खुटवडनगर येथे लॉन्ड्रीचा व्यवसाय करत होते. २५ जून रोजी सकाळी ते नेहमीप्रमाणे फिरण्यासाठी बाहेर पडले असताना भटक्या कुत्र्यांच्या टोळीने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. सलग नऊ दिवस त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

नवाकाळ
• मुंबई | मंगळवार ७ जुलै, २०२६ • पान -८



# युरोपचा उन्हाळा

**या उष्ण** झळाचं मुख्य कारण आहे तिथली भौगोलिक स्थिती. उन्हाळ्याचे महिने मुख्यत्वे जून, जुलै, ऑगस्ट. तेव्हा दिवस मोठा. मोठा म्हणजे जवळपास अठरा तासांचा. सूर्य सकाळी ५-६ पासून उगवतो, तो रात्री ९ नंतरच मावळतो. या दीर्घ दिवसात सूर्य २०-२५ डिग्री तापमानात असेल तर तो फारच आल्हाददायक 'समर' असतो युरोपियनांसाठी. लोक दिवसचे दिवस त्या हव्याहव्याशा उन्हात हिंडतात. कारण, बाकी महिने ऊन दुर्मीळ असतं, असलं तरी त्यात जीव नसतो.

यावर्षी मात्र 'सुपर एल-निनो'मुळे सूर्य युरोपात तापला. विशीत असलेलं तापमान तापमानमापकात 'तिशी'त पोहोचलं आणि शरीराला त्याच्या 'चाळिशी'च्या झळा बसायला लागल्या. 'समर'चा आनंद लुटण्यासाठी बाहेर पडलेल्या पर्यटकांसह स्थानिकही या झळांचे शिकार झाले. तिकडचा सूर्य पेटला की, तो नुसताच तळपत नाही, तर तो शरीराचं निर्जलीकरण

**पूनम छत्रे**

करतो. तोंडावर पाणी मारा, बाटली भरून पाणी प्या, आईसक्रीम खा. शरीरावर त्याचा परिणामच होत नाही. सूर्य सारं काही शोषून घेतो. उघड्या जागेवर असूनही श्वास घ्यायला त्रास होतो, घुसमटायला होते.

बरं, बाहेर गरम होतंय, म्हणून घरात बसावं, तर तिथली घरं एरवीच्या हिवाळ्यापासून सुरक्षित राहावी, म्हणून आतूनही बंदिस्त असतात! त्यामुळे, बाहेर गरम, घरात गरम होरपळायला होतं.

**युरोपचा उन्हाळा आम्ही अनुभवला, अगदी गेल्या आठवड्यात! ज्या बातम्या येत होत्या - सिग्नल वितळले, रस्ते वितळले, छतं तापली, तापलेल्या छतांवर लोकांनी 'क्रेप' आणि 'ऑमलेट्स' केली, पर्यटनस्थळं बंद केली, लोकांवर प्रशासनाने पाण्याचे फवारे मारले हे सगळं सत्य आहे, आम्ही अनुभवलं आहे. आमचा बदललेला रंगही त्याची साक्ष देईल!**

भारतात लोकांना वाटलंच की, आम्ही काय ४५ डिग्रीत कित्येक वर्षे जगतोय की! पण आपल्याकडे उशिरात उशीरा सूर्यास्त संध्याकाळी ७ ला होतो. त्यामुळे रात्रीत



तापमान कमी व्हायलाही वेळ मिळतो. शिवाय रात्री आपण खिडक्या, दारं उघडी टाकतो, रात्रीचा बाहेरचा थंडावा घरात घेण्याइतपत सोसवतो. तिथल्या घरात काचांचा वापर खूप असतो. काचा एकदा गरम झाल्या, की त्यांची उष्णता घरात पसरते, ती कमी व्हायला स्कोपच नसतो. आपल्याकडे घरोघरी पंखे आणि आता अनेक ठिकाणी एसीही असतात. तिकडे, आठ-दहा महिने गारच हवा असल्याने, पंखेसुद्धा लोकांकडे क्वचितच असतात. त्यामुळे गरमी कमी होणार कशी? असं ते सगळं इकडे विरूध्द तिकडे आहे.

असो. ती लाट गेली आता. आता युरोप नेहमीसारखं आल्हाददायक झालं आहे, पण परत जेव्हा लाट येईल, (आणि जागतिक तापमानवाढ होत असल्याने, ती येईलच) तेव्हा तिच्याशी दोन हात करायला प्रशासन आणि लोक सज्ज असतील. या हवेतून बोध घेऊन ते काहीतरी उपाययोजना करतील, अशी खात्री नक्की वाटते.

दरम्यान, आपल्याकडे पावसाळा सुरू झालाय. दरवर्षीपेक्षा पाऊस यंदा कमीच आहे, तरी दरवर्षीसारखा पूर येईलच, खड्डे पडतीलच, रस्ते वाहून जातीलच, गटारं तुंबतीलच, वीज जाईलच. पावसाळा दुर्मीळ नाही, तरी त्यावर काहीही कायमस्वरूपी उपाययोजना प्रशासन करणार नाही, हेही दुर्दैवाने खात्रीने सांगू शकतो.

जसा भारतीय उन्हाळा आणि युरोपीय उन्हाळ्यात फरक आहे, तसाच फरक प्रशासनाच्या कारभारात आहे, विचारसरणीत आहे आणि म्हणून प्रगतीतही आहे. हे या निमित्ताने सांगावसं वाटलं.

# अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित

■ मुंबई

**मुंबई** आणि उपनगरांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, भारतीय हवामान विभागाने मुंबईसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने आज ६ जुलै रोजी जाहीर करण्यात आलेल्या सर्व परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. या परीक्षांच्या नव्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत.

मुंबई विद्यापीठात आज एलएलएम, एमएससी आणि एम.कॉमसह विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार होत्या. शहरातील सततचा मुसळधार पाऊस, वाहतुकीवरील परिणाम आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून विद्यापीठ प्रशासनाने या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. सुधारित वेळापत्रक लवकरच मुंबई विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. गेल्या सहा दिवसांपासून मुंबई, ठाणे आणि परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली असून प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून काही शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

# भांग बाळगणे गुन्हा नाही! झारखंड हायकोर्टाचा निर्णय

**रांची** - भांग बाळगणे हे एनडीपीएस कायदा १९८५ म्हणजे अमली पदार्थ कायद्याअंतर्गत गुन्हा ठरत नाही. कारण कायद्यातील कलम २(३) मधील कॅनाबिसच्या व्याख्येत भांगचा समावेश करण्यात आलेला नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय झारखंड उच्च न्यायालयाने दिला आहे.



न्या. प्रदीप कुमार श्रीवास्तव यांनी हे प्रकरण निकाली काढताना आरोपीवरील दोषसिद्धी रद्द केली. न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या अहवालात जप्त केलेला पदार्थ गांजा नसून भांग असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. या प्रकरणात १७ ऑक्टोबर २००० रोजी चाईबासा बसस्थानकाजवळ एका ब्रीफकेसमधून सुमारे ११ किलो संशयित गांजा जप्त केल्याचा दावा पोलिसांनी केला होता. त्यानंतर आरोपीला एनडीपीएस कायद्यातील कलम २०(ब), २२(ब) आणि ११(ब) अंतर्गत दोषी ठरविण्यात आले होते. उच्च न्यायालयात आरोपीच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, एफएसएल अहवालात भांग आणि गांजा हे दोन्ही कॅनाबिसचे प्रकार असल्याचे नमूद असले तरी कायद्यातील कॅनाबिसच्या व्याख्येत भांगचा समावेश नाही. त्यामुळे भांग बाळगल्याबद्दल एनडीपीएस कायद्यानुसार शिक्षा होऊ शकत नाही. राज्य सरकारने भांगलाही एनडीपीएस कायद्याच्या कक्षेत आणण्याचा युक्तिवाद केला. मात्र, न्यायालयाने तो फेटाळून लावत विविध उच्च न्यायालयांच्या निर्णयांचा आधार घेतला. कायद्यात केवळ चरस, गांजा आणि त्यांचे मिश्रण यांचाच स्पष्टपणे समावेश करण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले. याशिवाय, एनडीपीएस कायदा किंवा राज्य सरकारने जारी केलेल्या कोणत्याही अधिसूचनेत भांगला प्रतिबंधित अमली पदार्थ म्हणून घोषित करण्यात आलेले नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरोपीची शिक्षा रद्द करून त्याचे अपील मंजूर केले.




मुंबईत एक व्यक्ती गटारात पडली आणि विधान भवनात त्यावर विषय निघाला असता बेजबाबदारपणे हसणाऱ्या भाजपा आमदार अमित साटम याच्या विरोधात मलबार हिल महाराष्ट्र नवनिर्माण सेना तर्फे विभाग अध्यक्ष दिनेश पुंडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. त्यावेळी अमित साटम गटारात पडला आहे असे प्रतिकात्मक करून त्याला जोडे मारण्यात आले. तसेच त्याच्या आमदारकीच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करण्यात आली. याप्रसंगी मलबार हिल विधानसभेतील महिला व पुरुष पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# भारताच्या 'गगनयान'च्या सॉल्व्ह रॉकेटची पहिली चाचणी यशस्वी

■ नवी दिल्ली

**भारतीय** अंतराळ संशोधन संस्थे(इस्त्रो)ने भारताच्या पहिली मानवी अंतराळ मोहीम 'गगनयान'शी संबंधित या मोहिमेसाठीची एक अत्यंत महत्त्वाची चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. सॉल्व्ह-सब ऑर्बिटल लँच व्हेईकल फॉर एक्सपरिमेंट (प्रयोगांसाठीचे सब-ऑर्बिटल प्रक्षेपण वाहन) नावाच्या रॉकेटसाठीच्या 'सॉलिड मोटर सिस्टम'ची (घन इंधन प्रणाली) ही यशस्वी चाचणी आहे.

इस्त्रोने दिलेल्या माहितीनुसार, ही चाचणी ३ जुलै रोजी सकाळी १० वाजता आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतिश धवन अंतराळ केंद्रावर पार पडली. चाचणीदरम्यान, रॉकेटच्या मोटरने शास्त्रज्ञांच्या अपेक्षेप्रमाणेच कामगिरी केली. या यशामुळे भारतीय शास्त्रज्ञांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गगनयान मोहिमेतील 'क्रू मॉड्यूल'च्या (अंतराळवीर जिथे बसणार आहेत तो भाग) सुरक्षिततेची चाचणी घेण्यासाठी सॉल्व्हची विशेष रचना करण्यात आली आहे. हे रॉकेट क्रू मॉड्यूलला साधारणपणे १० ते १७ किलोमीटर उंचीपर्यंत घेऊन जाईल. त्यानंतर, हे मॉड्यूल रॉकेटपासून वेगळे होईल आणि एकापाठोपाठ एक अशी दहा पॅराशूट उघडले जातील.

# उशिरा पडलेल्या पावसामुळे व्यथित शेतकऱ्याची आत्महत्या

■ छत्रपती संभाजीनगर

**उशिरा** पडलेल्या पावसामुळे पेरणी व शेतीच्या कामांबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे मानसिक तणावाखाली येऊन एका कर्जबाजारी शेतकऱ्याने आपल्याच शेतातील मोहाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सिल्लोड तालुक्यातील हळदा गावात घडली. गणेश भाऊराव गवळे (४५) असे या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. गणेश गवळे हे पाऊस लांबल्याने शेती कामाबाबत मानसिक तणावाखाली होते. तसेच त्यांच्यावर गटाचे कर्ज, खासगी कर्ज तसेच दुचाकीचे कर्ज असल्याने ते आर्थिक विवंचनेत होते. या एकंदर परिस्थितीमुळे त्यांनी काल रविवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास शेतातील मोहाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. आत्महत्येचे नेमके कारण पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

# इंद्रायणीला महापूर! चारही पूल बंद वारकऱ्यांना आळंदीत न येण्याचे आवाहन

■ आळंदी

**गेल्या** दोन दिवसांपासून मावळ तालुका, धरण पाणलोट क्षेत्र तसेच परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला महापूर आला आहे. त्यामुळे आळंदीतील इंद्रायणी नदीवरील सर्व पूल वाहतुकीसाठी तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांनी सध्या आळंदीला येणे टाळावे, असे आवाहन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आषाढी वारीसाठी उद्या पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. जोरदार पावसामुळे पालखी सोहळ्यासाठी आलेल्या वारकऱ्यांची



मोठी गैरसोय होत असून, प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. आळंदीतील इंद्रायणी नदी परिसरात पोलीस व नगरपरिषदेचे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. नदीच्या दोन्ही काठांवरील घाट पाण्याखाली गेले असून, शनिमंदिर परिसरातही पाणी शिरले आहे. सिद्धबेट तसेच माऊली बाग परिसरात पाणी साचले असून गोशाळेतील गाई-वासरांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. आळंदीतील चारही पूल बंद करण्यात आले असून, त्यापैकी तीन पुलांवरून पाणी वाहत आहे. चौथ्या पुलावरही पाणी चढण्यास सुरुवात झाली होती. इंद्रायणी घाटावरील भाविकांसाठी उभारण्यात आलेला चेंजिंग मंडप पुराच्या पाण्यात वाहून गेला.

# बाबा बर्फानीचे हिमलिंग ७ फुटांवरून एक फुटावर

**श्रीनगर** - जम्मू-काश्मीरमधील अमरनाथ गुहेत नैसर्गिकरित्या तयार होणाऱ्या बाबा बर्फानीचे हिमलिंगाचा आकार झपाट्याने कमी झाला असून, त्याची उंची आता अवघी एक फूट उरल्याचे उघडकीस आले आहे. आज आलेल्या छायाचित्रांवरून हिमलिंगाचा जवळपास ९० टक्के भाग वितळल्याचे दिसून येत आहे. २३ मे रोजी बीएसएफ जवानांनी जारी केलेल्या छायाचित्रांमध्ये हिमलिंगाची उंची सुमारे ७ फूट असल्याचे दिसत होते. तसेच २९ जून रोजी पहिल्या पूजेच्या दिवशीही हिमलिंगाची उंची ५ फुटांहून अधिक होती. गेल्या काही दिवसांत त्याचा आकार मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, ५७ दिवसांच्या अमरनाथ यात्रेला ३ जुलैपासून सुरुवात झाली आहे. यात्रेच्या पहिल्या तीन दिवसांत ५६ हजारांहून अधिक भाविकांनी बाबा बर्फानीचे दर्शन घेतले आहे. ही संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १८.६ टक्क्यांनी अधिक आहे. मागील वर्षी पहिल्या तीन दिवसांत ४७ हजार ९७२ भाविकांनी दर्शन घेतले होते.

# केतन अग्रवाल लोहगड मृत्यू प्रकरण सियाच्या घरासमोर जोडे मारा आंदोलन

■ पुणे

**पुण्यातील** लोहगडावर झालेल्या केतन अग्रवाल याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा निषेध करण्यासाठी 'पायल



तिवारी बिटिया फाऊंडेशन', 'गुलाबो गँग' आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोपी सिया गोयल हिच्या मार्केट यार्ड येथील लीलाकुंज निवासस्थानाबाहेर 'जोडे मारो' आंदोलन केले. आंदोलनावेळी त्यांनी न्यायाची आणि निष्पक्ष तपासाची मागणी केली.

आंदोलनाच्या सुरुवातीला कार्यकर्त्यांनी हाताला काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केला. त्यानंतर प्रतीकात्मक स्वरूपात 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचा समारोप रघुपती राघव राजाराम हे भजन गाऊन करण्यात आला. यावेळी आरोपी व तिच्या कुटुंबियांना सद्बुद्धी लाभावी आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळावा अशी प्रार्थना करण्यात आली.

# वक्फ बोर्डावर पहिल्यांदाच दोन हिंदू मध्य प्रदेश सरकारचा ऐतिहासिक निर्णय

■ भोपाळ

**मध्य प्रदेश** सरकारने वक्फ बोर्डाच्या इतिहासात प्रथमच दोन हिंदू सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने सुधारित वक्फ कायदा-२०२५ अंतर्गत मध्य प्रदेश वक्फ बोर्डाची पुनर्रचना केली. त्यामध्ये १० सदस्यीय नव्या बोर्डात प्रथमच बिगर-मुस्लीम सदस्यांना स्थान दिले आहे. या नियुक्तीची अधिकृत अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध केली आहे. या निर्णयावरून देशभरात चर्चा सुरू झाली आहे.

केंद्र सरकारने सुधारित वक्फ कायदा-२०२५ लागू केल्यानंतर मध्य प्रदेश सरकारने कलम १३(१) अंतर्गत अधिकारांचा वापर करून नव्या वक्फ बोर्डाची स्थापना केली. सुधारित कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने बोर्डाची पुनर्रचना करण्यात आली आहे. नव्या वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदी सनवर पटेल यांची नियुक्ती झाली आहे. १० सदस्यीय बोर्डात विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींना स्थान दिले आहे. त्यामध्ये माजी केंद्रीय मंत्री नजमा हेपतुल्ला, भोपाळ उत्तरचे आमदार आतिफ अकील, फैझान खान (उज्जैन), सिस्टर फातिमा चौधरी (इंदूर), शायस्ता सुलतान (नगरसेविका, बेरसिया), शबाना खान (नगरसेविका, रतलाम) तसेच मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक कल्याण विभागाचे आयुक्त यांचा समावेश आहे.

# ताजमहाल मुळात शिवमंदिर होते का? न्यायालयाने सरकारकडून उत्तर मागितले

■ नवी दिल्ली

**आग्रा** येथील प्रसिद्ध ताजमहाल मुळात तेजो महालय, म्हणजेच भगवान शंकराला समर्पित असलेले एक हिंदू मंदिर असल्याचा दावा करणाऱ्या एका प्रलंबित दिवाणी खटल्याच्या संदर्भात, ताजमहालची पाहणी आणि छायाचित्रण करण्यासाठी एका वकील आयुक्तांच्या नियुक्तीची मागणी करणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांनी सोमवारी केंद्र सरकार आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडून या प्रकरणी प्रतिसाद मागवला असून, त्यांना त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

भगवान श्री अग्रेश्वर महादेव नागनाथेश्वर विराजमान तेजो महालय मंदिर पॅलेस यांनी त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी हरी शंकर जैन आणि इतरांमार्फत दाखल केलेल्या याचिकेत, ताजमहालच्या तपासणीसाठी वकील आयुक्तांची नियुक्ती करण्यास कनिष्ठ न्यायालयाने आणि पुनरीक्षण न्यायालयाने दिलेल्या नकाराला आव्हान देण्यात आले आहे. » पान ७ वर


**अमेरिकेच्या २५० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त फिलाडेल्फियाच्या 'इंडिपेंडन्स नॅशनल हिस्टॉरिकल पार्क' मध्ये एक खास 'टाईम कॅप्सूल' बनवून जमिनीत पुरण्यात आली आहे. ९०० पौंड (४०८ किलो) वजनाची ही कॅप्सूल थेट २५० वर्षांनंतर म्हणजेच अमेरिकेच्या ५०० व्या स्वातंत्र्यदिनी २२७६ मध्ये बाहेर काढली जाईल.**

# अमेरिकेची 'टाईम कॅप्सूल' २५० वर्षांसाठी जमिनीत पुरली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ फिलाडेल्फिया

**भविष्यातील** पिढ्यांना २०२६ मधील अमेरिकेची जीवनशैली, संस्कृती आणि तंत्रज्ञान समजावे, यासाठी कॅप्सूलमध्ये अमेरिकेतील सर्व ५० राज्ये आणि सरकारच्या सर्व विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २०० वस्तू कॅप्सूलमध्ये ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय त्यात 'लायब्ररी ऑफ काँग्रेस'च्या संग्रहातील डिजिटल प्रती असलेली मानवनिर्मित 'सिंथेटिक डीएनए'ची बाटली आणि अमेरिकन गृहयुद्धातील गरुडाची पिसे, शीतपेयाची बाटली आणि अमेरिकन नागरिकांनी भविष्यासाठी लिहिलेल्या संदेशांच्या नोट-कार्डांचा समावेश आहे. ही कॅप्सूल गंजरोधक आणि वजनाने जड अशा 'स्टेनलेस स्टील'पासून बनवण्यात आली




आहे. पाणी किंवा आर्द्रता आत जाऊ नये म्हणून याला खास डिझाईन केलेल्या बेल-जार कव्हरने सुरक्षित करण्यात आले आहे, ज्यामध्ये हवा साठून राहून ती कॅप्सूलला कोरडे ठेवेल.

# आसाम विधिमंडळात प्रथमच हिंदी अधिकृत कामकाज भाषा

■ गुवाहाटी

**आसाम** विधानसभेच्या ८९ वर्षांच्या इतिहासात प्रथमच हिंदीचा अधिकृत कामकाजाच्या भाषेत समावेश करण्यात आला आहे. आजपासून सुरू झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून हा निर्णय लागू झाला आहे. १६व्या आसाम विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू झाले असून, ३१ जुलैपर्यंत चालणार आहे. या अर्थसंकल्पीय अधिवेशनापासून आसामी, इंग्रजी आणि बोडो यांच्यासोबत हिंदीचाही अधिकृत कामकाजाच्या भाषांमध्ये समावेश करण्यात आला आहे. विधानसभा अध्यक्ष रणजित दास यांनी म्हटले आहे की, शनिवारी झालेल्या जनरल पर्पज समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हिंदी ही राष्ट्रभाषा आहे, असे कारण त्यांनी यावेळी दिले. दरम्यान, हिंदीचा समावेश झाल्यानंतर बोडो भाषेला अधिकृत भाषेच्या यादीतून वगळण्यात आल्याच्या अफवा समाजमाध्यमांवर पसरल्या. या अफवांमुळे काही भागांत निदर्शने झाली तर काही ठिकाणी आसामी भाषेतील फलकाला काळे फासले. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी विधानसभा कामकाजातून बोडो भाषा वगळली जाणार असल्याच्या चर्चेला स्पष्टपणे फेटाळले.